




नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR



**Physioflex.** Working towards healthy lifestyle

Physiotherapy Clinic & Fitness Studio

**Dr. Moinuddin Farooque** (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.P.T.)
9021756646 8329099901

Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
**Shivraya Multi Speciality Hospital,** DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik



वर्ष ५३ वे, अंक २०३ Year : 53, Issue No. : 203 | नाशिक, सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५ Nashik, Monday 29 December 2025 | R.N.I. Regd. No.20904/72 Postal Reg. No. NSK/16/2024-2026 | पाने ६, किंमत २ रुपये Pages : 6, Price Rs. 2


# शहरात पाच महिलांचे विनयभंग; गुन्हे दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- शहरातील वेगवेगळ्या परिसरात पाच महिलांचे विनयभंग झाल्याच्या घटना घडल्या असून, याबाबत विनयभंग करणाऱ्यांविरुद्ध पाच पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

विनयभंगाची पहिली घटना निमाणी परिसरात घडली. पीडित महिला या दि. २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास पंचवटीतील निमाणी परिसरात उभ्या होत्या. त्यावेळी त्यांच्या ओळखीचा असलेला आरोपी पंकज दत्ता तलवलकर (रा. सीतागुंफा रोड, पंचवटी) हा त्यांच्याजवळ आला. ''तू माझ्यासोबत का बोलत नाहीस?'' असे बोलून त्याने पीडित महिलेचा हात पकडला. नंतर त्याने महिलेला हाताच्या चापटीने व बुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ केली. ''तू माझ्याशी बोलली नाहीस, तर तुझ्या नवऱ्याला मारून टाकीन,'' अशी धमकी देऊन तो तेथून निघून गेला. या प्रकरणी पंकज तळवलकरविरुद्ध पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण करीत आहेत.

विनयभंगाची दुसरी घटना गंजमाळ परिसरात घडली. फिर्यादी महिला व त्यांची बहीण दि. २८ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास गंजमाळ परिसरातील भीमवाडी येथून रस्त्याने पायी जात होत्या. त्यावेळी आरोपी नितीन गहिले याने काही एक कारण नसताना पीडितेला शिवी दिली. त्याबाबत विचारणा केली असता आरोपी नितीनने पुन्हा शिवीगाळ करीत पीडितेची गच्ची पकडून स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करीत तिला मारहाण केली. या प्रकरणी नितीन गहिरेविरुद्ध भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

विनयभंगाची तिसरी घटना इंदिरानगर परिसरात घडली. पीडित महिला व त्यांची मुलगी दि. २७ डिसेंबर रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास इंदिरानगर परिसरात उभ्या असता आरोपी विजय छाजेड तेथे आला. त्याने पीडित महिला व त्यांच्या मुलीला हाताच्या चापटीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. नंतर त्याने फिर्यादी यांच्या पत्नीच्या अंगावर हात टाकून स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केले. विजय छाजेडने नंतर फिर्यादी यांच्या मुलीला जिवे मारण्याची धमकी देऊन ''माझ्या नादी लागलात, तर वाईट परिणाम होतील,'' असा दम दिला. या प्रकरणी विजय छाजेड व त्याच्या मुलाविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार शेख करीत आहेत.

विनयभंगाची चौथी घटना बोधलेनगर येथे घडली. फिर्यादी यांच्या राहत्या घरी त्यांची बहीण सुप्रिया हिने तिच्या नवऱ्याविरोधात दिलेली तक्रार मागे घ्यावी या कारणावरून कुरापत काढून आरोपी शोभा कापडणीस व त्यांचा मुलगा कल्पेश कापडणीस हे तेथे आले. त्यांनी फिर्यादीच्या आईवडिलांना शिवीगाळ करीत असताना समजावून सांगितल्याचा राग आल्याने कापडणीस मायलेकाने मारहाण केली, तसेच भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या फिर्यादीला जोराचा धक्का देऊन स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार हिवाळे करीत आहेत.

विनयभंगाचा पाचवा प्रकार नाशिकरोड येथे घडला. फिर्यादी या आर्टिलरी सेंटर रोड परिसरात राहतात. त्या घराजवळ असताना फिर्यादीच्या पतीच्या ओळखीचा इसम गंगाधर उत्तम श्रीखंडे (रा. जय भवानी रोड, नाशिक) याने हातउसनवार घेतलेल्या पैशाच्या कारणावरून कुरापत काढली, तसेच हाताच्या चापटीने मारहाण करून फिर्यादीचा गाऊन ओढून स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून महिलेचा विनयभंग केला. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गंगाधर श्रीखंडेविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार बरेलीकर करीत आहेत.

# हमखास निवडून येणाऱ्यांनाच गिरीश महाजनांकडून प्राधान्य

## आज युतीची शक्यता; चौरंगी लढतीचे संकेत

**नाशिक (भ्रमर वृत्तसेवा) :- गिरीश महाजनांकडून रात्री उशिरापर्यंत निवडणुकीचा आढावा सुरू होता. नाशिकमधील हमखास निवडून येणाऱ्या जागांवर विशेष मंथन झाले असून, आजच युतीची घोषणा होण्याची शक्यता आहे.**

नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागावाटपाचा तिढा अद्यापही कायम असून, राजकीय घडामोडींना वेग आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना भाजपचे संकटमोचक मंत्री गिरीश महाजन मैदानात उतरले आहेत.

भाजपचे प्रभावी नेते आणि पक्षातील संकटमोचक म्हणून ओळख असलेल्या गिरीश महाजन यांच्यासाठी नाशिक महापालिका निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक नसून, पक्षाची प्रतिष्ठा पणाला लागलेली लढाई मानली जात आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिकेवर सत्ता मिळवणे हे सर्वच प्रमुख राजकीय पक्षांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, गिरीश महाजन यांनी नाशिकमध्ये रात्री उशिरापर्यंत निवडणूक आढावा बैठक घेतली. या बैठकीत हमखास निवडून येणाऱ्या जागांवर विशेष मंथन करण्यात आले. या बैठकीत काही प्रभागांमधील उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब झाल्याचं देखील सूत्रांकडून सांगितले जात आहे. मात्र, नाशिकमध्ये महायुतीची अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, नाशिक महापालिकेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज आणि उद्या शेवटचा दिवस असल्याने इच्छुकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. शिवसेना आणि भाजपा यांच्यात जागा वाटपाचा तिढा अजून कायम आहे. त्यात राष्ट्रवादीचेही अजून काही ठरत नाही. भाजपाने शंभर प्लसचा नारा दिला असून प्रारंभी महायुतीचे शंभर प्लस म्हणत असले तरी ऐनवेळी भाजपा स्वबळावर निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. त्यामुळे युतीच्या चर्चेचे गुन्हाळ अजून काही संपण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आज गिरीश महाजन यांच्याकडून युतीबाबत काही ठोस घोषणा होणार का? याकडे संपूर्ण नाशिक जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सध्याच्या राजकीय हालचाली पाहता नाशिकमध्ये भाजप, शिंदे गटाची शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, ठाकरे बंधूंची शिवसेना-मनसे युती व काँग्रेस अशी चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. भाजप आणि शिवसेनेची राजकीय गणिते जुळलीच तर शिवसेनेला बरोबर घेऊन भाजप लढेल. ठाकरे बंधू हे काँग्रेसला बरोबर घेऊन लढतील, असे बोलले जात आहे. अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना एकत्र लढण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नाशिकमध्ये लढतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे.

# पोलीस असल्याची बतावणी करुन वृद्धाची सोन्याची अंगठी लांबवली

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- पोलीस असल्याची बतावणी करत झडती घेण्याच्या बहाण्याने एका वयोवृद्धाची सोन्याची अंगठी लांबवल्याची घटना राणेनगर परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, फिर्यादी ज्ञानेश्वर नरहरी शिरसाठ (वय ६५, रा. राणेनगर) हे २८ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घराच्यामागे असलेल्या पटांगणात शतपावली करत होते. त्यावेळी एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ येत म्हणाला, आम्ही पोलीस आहोत, इलेक्शनमुळे आम्हाला येथे ड्युटी लागली आहे. तुम्ही काय विकत आहात, असे म्हणत त्याने शिरसाठ यांची झडती घेतली. नंतर त्या इसमाने त्याच्या जोडीदाराला बोलवत शिरसाठ यांच्या गाडीची चावी आणि हातातील साडेचार ग्रॅम वजनाची ३२ हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी काढून रुमालात ठेवण्याचा बहाणा केला. नंतर ते तेथून मोटारसायकलवर पळून गेले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिरसाठ यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात दोघा अनोळखी इसमांविरुद्ध फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस हवालदार पवार करीत आहे.

# केंद्रीय मंत्री जाधव यांच्या कारचा अपघात

**वाशिम (भ्रमर वृत्तसेवा) :-** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कारचा भीषण अपघात झाला. समृद्धी महामार्गावर वाशिम जिल्ह्यातील मालेगावनजीक ही घटना घडली. या अपघातात मंत्री प्रतापराव जाधव यांचे अंगरक्षक, त्यांचे सहकारी व कारचालक असे तिघे गंभीर जखमी झाले.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना नागपूर विमानतळावर पोहोचविल्यानंतर हे तिघे मेहकरकडे परत येत असताना रात्री उशिरा हा अपघात झाला. कारने ट्रकला जोरदार धडक दिली. हा अपघात झाला तेव्हा मंत्री कारमध्ये नव्हते. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये कारचा चक्काचूर झाला. अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या तिघांना पोलिसांनी तात्काळ वाशिम येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू असून तिघांचीही प्रकृती चिंताजनक आहे. मंत्री प्रतापराव जाधव यांना अपघाताची माहिती मिळताच त्यांनी दिल्ली दौरा रद्द केला. ते मुंबईवरून मेहेकरला परत आले. त्यांनी जखमींची भेट घेत त्यांच्या प्रकृतीबाबत विचारपूस केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात समृद्धी महामार्गावर माळेगावजवळ झाला. या ट्रकने महामार्गावर अचानक युटर्न घेतला त्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि या कारने थेट ट्रकला जोरदार धडक दिली. अपघातामध्ये जीवितहानी झाली नाही मात्र कारमधील तिघे जण गंभीर जखमी झाले. अपघातात कारचा चुराडा झाला. पोलिस अपघाताचा तपास करत आहेत.

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** प्रतिबंधित नायलॉन मांजाची विक्री करताना आढळून आलेल्या दोन विक्रेत्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत पोलीस शिपाई विशाल कुवर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले, की आरोपी चंद्रेश गोविंद पाटील (वय ३७, रा. मराठा कॉलनी, सिन्नर फाटा, नाशिकरोड) व स्वौम्य भुकटीयार (रा. सिन्नर फाटा, नाशिकरोड) हे दोघे जण काल (दि. २७) सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास सिन्नर फाटा येथील गायकवाड मळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाच हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजा विक्री व साठवणूक करताना मिळून आले. यावेळी आरोपींकडून मोनोकाईट फायटर कंपनीचे सात नायलॉन मांजाचे रोल व मोनोकाईट कंपनीचे तीन नायलॉन मांजाचे रोल असा पाच हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात दोघा विक्रेत्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना अटक करण्यात आली आहे.

# युवकाला जिवे मारण्याचा प्रयत्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** भंगाराच्या जुन्या हिशेबावरून २१ वर्षीय युवकावर कोयत्याने वार करून त्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना भगूर परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी, की फिर्यादी अरबाज समीउल्ला खान यांच्या वडिलांचे भंगार खरेदी-विक्री करण्याचे दुकान आहे. अरबाज यांच्या नातेवाईकांचे निधन झाल्याने ते भगूर येथील कब्रस्तानमध्ये दफनविधीसाठी गेले होते. दरम्यान, फिर्यादी अरबाज याचे आजोबा व आरोपी मोबिन पठाण यांच्यात भंगाराचा जुना व्यवहार झाला होता. त्याचे काही पैसे बाकी होते. अरबाज दफनविधीसाठी आला असता आरोपी मोबिन कादर पठाण (वय ५२, रा. भगूर कब्रस्तान) याने अरबाजला शिवीगाळ करून ''तुमच्याकडे पाहून घेतो,'' अशी दमदाटी केली. त्यावेळी अरबाजने मोबिनला समजावण्याचा प्रयत्न केला असता मोबिनचा भाचा साजिद शेख हा तेथे कोयता घेऊन आला. त्याने मोबिनची बाजू घेत भांडणाची कुरापत काढून अरबाज यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उद्देशाने अरबाजच्या डोक्यावर व हाताच्या पंजावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात अरबाज गंभीर जखमी झाला. या प्रकरणी दोघा आरोपींविरुद्ध अरबाजच्या फिर्यादीवरून देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मोबिनला घटनेच्या दिवशी रात्रीच अटक केली आहे.

# मतदार जनजागृती अभियानांतर्गत ५१०० अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मतदार जनजागृती अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणासाठी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना नाशिक महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृती व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेची शपथ देण्यात आली.



यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी तसेच निवडणूक प्रक्रिया मुक्त, निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडण्याची सामूहिक शपथ घेतली. या शपथेचे वाचन नाशिक महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले.

मतदान प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या केंद्राध्यक्ष, तसेच अधिकारी क्रमांक १, २ व ३ यांच्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन दादासाहेब गायकवाड सभागृह, कालिदास कला मंदिर व पंचवटी येथील सदाशिव भोरे नाट्यगृह येथे करण्यात आले होते. या प्रशिक्षण सत्रांमध्ये सकाळ व दुपार सत्रात सह जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ व अभिजीत नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिकारी, कर्मचाऱ्यांना परिपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे नियोजन तहसीलदार रामजी राठोड, सुनीता जराड व पंकज पवार यांनी केले होते. नाशिक महानगरपालिकेच्या वतीने उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, अजित निकत, नितीन पवार यांनी संपूर्ण प्रशिक्षण सत्रांचे नियोजन केले. प्रशिक्षणादरम्यान उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी, 'आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू, मुक्त, निष्पक्ष व शांततापूर्ण निवडणुकांचे पावित्र्य राखू तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे, कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, धर्म-वंश-जात-भाषा आदींच्या प्रभावाखाली न येता मतदान करू' अशी शपथ घेत जय हिंद, जय भारत असा जयघोष केला. या प्रसंगी जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी या प्रतिज्ञेचे अनुकरण प्रत्येक भारतीय नागरिक व प्रत्येक मतदाराने करावे, असे आवाहन केले. तसेच मतदार जनजागृती अभियान अधिक व्यापक करण्यासाठी सर्व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून अशी प्रतिज्ञा घेण्यात यावी, असे आवाहन उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना करण्यात आले.

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेले हे मतदार जनजागृती अभियान नाशिक महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेसाठी एक महत्त्वाचे व सकारात्मक पाऊल असून, आगामी सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नागरिकांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण करण्यास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे, असा विश्वास स्विप नोडल तथा शिक्षण अधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी व्यक्त केला.

# द्वारका चौकातील कोंडी फोडण्यासाठी केंद्राची २१४ कोटींची मंजुरी

## खा. वाजेंच्या मागणीला यश

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नेहमीच वाहनधारकांना अडचणीचा ठरलेल्या द्वारका चौकातील वाहतूक कोंडीवर अखेर कायमस्वरूपी तोडगा निघाला आहे. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या द्वारका चौक सुधार प्रकल्पाला २१४ कोटी रुपयांची केंद्रीय मंजुरी मिळाली असून, हा निर्णय म्हणजे खासदार राजाभाऊ वाजे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा थेट परिणाम असल्याचे स्पष्ट झाले आहे.



> निवडून आल्यापासून माझ्या अजेंड्यावर असलेला हा प्रश्न मार्गी लागत आहे, याचा आनंद आहे. ना. नितीन गडकरी याबाबत सकारात्मक होतेच. थोडा उशीर झाला असला तरी प्रकल्प होतोय हे महत्वाचे. बाकी फक्त द्वारका चौकाचा प्रश्न मिटतोय म्हणून मी समाधानी नाही, द्वारका ते नाशिकरोड उड्डाणपुलासाठी देखील संघर्ष सुरूच राहील.
>
> – खा. राजाभाऊ वाजे

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतः सोशल मीडियावरून या निर्णयाची घोषणा करत, नाशिक शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी द्वारका चौकाच्या सुधारणेस मंजुरी देण्यात आल्याचे जाहीर केले. ही घोषणा म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून नाशिककरांच्या जखमेवर ठेवलेला मलम ठरला आहे. एक चौक, अनेक प्रश्न आणि सातत्याचा संघर्ष द्वारका चौक हा नाशिकमधील केवळ एक वाहतूक चौक नसून, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग, नाशिकरोड, पंचवटी, शहराचा मध्यभाग आणि औद्योगिक क्षेत्रांना जोडणारा हा मुख्य श्वासमार्ग आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची प्रचंड संख्या आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा यामुळे हा चौक कायमस्वरूपी कोंडीचे प्रतीक बनला होता. याच पार्श्वभूमीवर खा. राजाभाऊ वाजे यांनी सिग्नल-फ्रि वाहतूक, भुयारी मार्ग (अंडरपास), वापरात नसलेल्या पादचारी सबवेचे वाहन अंडरपासमध्ये रूपांतर, कुंभमेळ्यासाठी दीर्घकालीन वाहतूक आराखडा या मागण्यांसाठी वेगवेगळ्या टप्प्यांत सातत्याने पत्रव्यवहार, तांत्रिक मांडणी आणि केंद्रीय मंत्र्यांसोबत प्रत्यक्ष भेटी घेतल्या. अनेकदा दुर्लक्षित राहणारा हा प्रश्न त्यांनी केंद्र सरकारच्या अजेंड्यावर ठामपणे आणला.

२०२७ मध्ये नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा हा केवळ धार्मिक नव्हे, तर प्रशासनिक आणि पायाभूत सुविधांची कसोटी असणार आहे. कोट्यवधी भाविक, वाहनांची प्रचंड गर्दी आणि मालवाहतुकीचा ताण लक्षात घेता, द्वारका चौकाचा प्रश्न सोडवणे अपरिहार्य होते. अखेर केंद्र सरकारने या वास्तवाची दखल घेत, २१४ कोटींच्या भरीव तरतुदीसह प्रकल्पास मंजुरी दिली. या प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक सुरळीत होईल, सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम बनेल आणि मालवाहतुकीचा वेळ व खर्च कमी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नाशिकसाठी केवळ प्रकल्प नव्हे, तर दिशादर्शक निर्णय द्वारका चौक प्रकल्प ही केवळ एक विकास योजना नसून, नाशिक शहराच्या भविष्यातील नियोजनाची दिशा ठरवणारा निर्णय मानला जात आहे. धार्मिक, औद्योगिक आणि कृषी केंद्र असलेल्या नाशिकसाठी हा प्रकल्प 'गेम चेंजर' ठरणार आहे. पाठपुरावा म्हणजेच परिणाम नाशिकसाठी तात्पुरते उपाय नव्हे, तर शाश्वत आणि दीर्घकालीन उपाय हवेत, ही भूमिका खा. राजाभाऊ वाजे यांनी सातत्याने मांडली.

आज केंद्र सरकारकडून मिळालेली मंजुरी म्हणजे त्या भूमिकेचीच ठोस पावती आहे. द्वारका चौकाच्या प्रश्नावर मिळालेले हे यश नाशिककरांसाठी दिलासादायक तर लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे जिवंत उदाहरण ठरणारे आहे.

# इच्छुक उमेदवारांनी नेले आतापर्यंत ५,४०६ अर्ज

## नाशिक महापालिका निवडणूक : पक्ष कार्यालयांतील गर्दी ओसरली

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** नाशिक महानगरपालिका पंचवार्षिक निवडणुकीच्या अर्ज विक्रि संदर्भात चौथ्या दिवशी ५५३ इच्छुकांनी अर्ज खरेदी केले असून आत्तापर्यंत २२ जागांसाठी ५,४०६ अर्जांची विक्री झाली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता दोनच दिवस उरले असून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उद्या शेवटचा दिवस आहे. सहा विभागांतून पहिल्या दिवशी १७६३, दुसऱ्या दिवशी १९४२ व तिसऱ्या दिवशी ११४८ तर चौथ्या दिवशी शनिवारी ५५३ इच्छुकांनी अर्जांची खरेदी केली. त्यामुळे एकूण चार दिवसात ५,४०६ अर्जांची विक्रमी विक्री झाली आहे. अर्ज विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असली तरी प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्याबाबत इच्छुकांनी अद्याप सावध भूमिका घेतल्याचे चित्र आहे. अंतिम तारीख जवळ येताच अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, दोन दिवसांपूर्वीच्या भाजपा प्रवेश सोहळ्यातील वादंगामुळे भाजपासह अन्य राजकीय पक्षांच्या कार्यालयातही तुरळक गर्दी दिसून आली. उमेदवारी मिळणार असल्याची खात्री असलेले व इच्छुक देखील आपल्या प्रभागात प्रचारासाठी रममान झाल्यामुळे पक्ष कार्यालयातील ही गर्दी रोडावली असल्याचे सांगितले गेले. मात्र, आता प्रत्येक इच्छुकाला आपल्या गळ्यातच उमेदवारीची माळ पडेल असे वाटत असल्यामुळे आणि मतदारांची थेट संभाषण करायला कालावधी कमी असल्यामुळे वेळेचे महत्व लक्षात घेऊन उमेदवारी मिळण्यापूर्वीच इच्छुक मोठ्या प्रमाणावर मतदारांच्या प्रत्यक्ष दारोदारी जाऊन भेटी, बैठका मेळावे घेत आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत सर्व राजकीय पक्ष कार्यालयांप्रमाणेच उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महापालिकेच्या विभागीय कार्यालयात उमेदवार व त्यांच्या समर्थकांची गर्दी आणखी वाढणार असल्याचे स्पष्ट संकेत दिसून येत आहेत.

# लाच मागितल्याप्रकरणी मालेगावचे शिक्षणाधिकारी चंद्रकांत पाटील यांच्यावर गुन्हा दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):-** शिक्षकांची पेन्शन सुरू करण्यासाठी लाच मागितल्याप्रकरणी मालेगाव येथे शिक्षणाधिकाऱ्याविरुद्ध पवारवाडी पोलीस ठाण्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने काल मालेगाव शहरातील पवारवाडी या पोलीस ठाण्यामध्ये मालेगाव महानगरपालिकेतील तत्कालीन प्रशासक आणि सध्या धुळे जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक उप शिक्षणाधिकारी असलेले चंद्रकांत पाटील यांनी मालेगाव महानगरपालिकेमध्ये सन २०२४ पूर्वी लागलेल्या शिक्षकांनी पेन्शन योजना लागू हवी यासाठी म्हणून जो अर्ज केला होता. त्या अर्जावर कारवाई करण्यासाठी प्रत्येक शिक्षकाकडून दहा हजार रुपयांप्रमाणे दोन लाख रुपयांची मागणी केली होती. या मागणीची पडताळणी तक्रार आल्यानंतर नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने ७ ऑगस्ट २०२५ मध्ये करण्यात आली होती.

या अर्जावर निर्णय घेण्यासाठी चंद्रकांत पाटील यांनी अर्जदारांना प्रत्येकी दहा हजार रुपये प्रमाणे दोन लाख रुपयांची रक्कम आणून द्यावी आणि त्यानंतरच त्यांची फाईल मालेगाव महापालिका आयुक्तांकडे पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यादरम्यान चंद्रकांत पाटील यांची धुळे जिल्हा परिषदेमध्ये बदली झाली, तरी देखील या सगळ्या प्रकरणाचा तपास सुरू होता. हा प्रकार समोर आल्यानंतर नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक भरत तांगडे, अप्पर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, सुनील दोरगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपाधीक्षक सुरेश शिरसाट यांच्या पथकातील कर्मचारी विनोद चौधरी, दीपक पवार, योगेश शिंदे, संजय ठाकरे यांच्या पथकाने तपास पूर्ण करून रविवारी पवारवाडी पोलीस ठाण्यामध्ये चंद्रकांत पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक जीवनात अस्वास्थ्य राहील. स्वमताग्रह टाळायला हवा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **वृषभ** : दूरचे प्रवास टाळायला हवेत. अंगच्या कला-गुणांचा विकास होईल. सढळ हातानं खर्च करू नये.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात उत्साह वाढेल. आर्थिक समस्यांमधून मार्ग निघेल. सामंजस्यानं रहावं.
- **कर्क** : सौख्याच्या घटना घडतील. षष्ठातील पापग्रह प्रकृतीच्या तक्रारी ठेवतील. कार्यक्षेत्रात विचारानं रहावं.
- **सिंह** : शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. कला-गुणांचा विकास होत जाईल. खर्चाचे प्रमाण वाढेल.
- **कन्या** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. घाईने निर्णय घेऊ नका. स्थावर प्रश्न आणखी बिकट होतील.
- **तूळ** : उत्साहवर्धक घटना घडतील. समाधान लाभेल. उष्णतेपासून विकाराची शक्यता आहे.
- **वृश्चिक** : आर्थिक समस्यांमधून मार्ग काढावा गुंतवणूक विचारानं करावी. गुरूकृपेने कामांना गती प्राप्त होईल.
- **धनु** : अपेक्षित कामांसाठी अधिक प्रयत्न करावे. प्रकृतीची काळजी घ्यावी. पोटाच्या तक्रारींकडे लक्ष द्या.
- **मकर** : कार्यक्षेत्रात अनुकूलता राहील. व्यवसायात समाधान लाभेल. कोणताही निर्णय घाईनं घेऊ नका.
- **कुंभ** : वाहतूक, विमा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. समस्यांमधून मार्ग निघेल. नव्या कामांना गती येईल.
- **मीन** : कार्यक्षेत्रात अनुकूलता वाढेल. नव्या कामांना गती येईल. भाग्य वृध्दींगत करणाऱ्या घटना घडतील.

सौंदर्यसाधना

## कॉस्मेटिक्स वापरताना...

* उत्पादन उघडल्यानंतर ते विशिष्ट कालावधीपर्यंत वापरता येतं. ते किती महिने वापरायचं हे उत्पादनावर नमूद केलेलं असतं. त्यामुळे त्यावरची सर्व माहिती नीट वाचून घ्यायला हवी. * कंसिलर १२-१८ महिने, ऑईल फ्री फाउंडेशन १२ महिने, पावडर दोन वर्षं, कॉम्पॅक्ट १८ महिने आणि ब्लश १२ ते १८ महिने वापरावं. * पावडर आय शॅडो दोन वर्षं, क्रीम आयशॅडो १२-१८ महिने, आयलायनर दोन वर्षं, मस्कारा ३-४ महिने तर काजळ ३-६ महिने इतक्या कालावधीसाठी वापरावी. लिपस्टिक्स/लिपग्लॉस १८ महिने ते दोन वर्षं, लिप लायनर दोन वर्षं तर लिप बाम एक ते पाच वर्षांपर्यंत वापरता येतो. नेल पॉलिश एक वर्षं तर रिमूव्हर तीन वर्षांपर्यंत वापरता येतो. * घाणेरडे मेकअप ब्रश आणि ब्युटी ब्लेंडर्स बॅक्टेरियांचे वाहक असतात. त्यामुळे तुटलेले, खराब झालेले ब्रश कचऱ्याच्या डब्यात फेकून द्यावे. फाटलेले किंवा दुर्गंध येणाऱ्या ब्युटी ब्लेंडर्स तसंच स्पंजना बाहेरचा रस्ता दाखवावा. * स्पंज, ब्रश, ब्लेंडर्स महिन्यातून दोनदा ब्रश क्लिनर किंवा बेबी शँपूने धुवावे. पूर्ण वाळल्यानंतरच त्यांचा वापर करावा. * इतरांच्या लिपस्टिक्स, काजळ वापरू नये. मेकअप उत्पादनांना शक्यतो हात लावू नये.

## २९ डिसेंबर

दिनविशेष

- १९६५ : भारतीय बनावटीचा पहिला रणगाडा तयार.
- १९६७ : सुप्रसिद्ध गायक पंडित ओंकारनाथ ठाकूर यांचं निधन.
- २०१२ : नवी दिल्लीत सामूहिक बलात्काराला बळी पडलेल्या तरुणीची मृत्यूशी झुंज अपयशी.
- २०१३ : भारतीय अनुवादक आणि लेखक जगदिश मोहंती यांचं निधन.
- २०१५ : ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते सुनील चौधरी यांची आत्महत्या.
- २०१७ : मेघालयात सत्ताधारी काँग्रेसला मोठा धक्का. पाच आमदारांचे राजीनामे.

महत्त्वपूर्ण काही...

## का असतात दिवे?

आपण विमानप्रवास करतो पण बरेच प्रश्न पडत असल्याने गोंधळून जातो. अलिकडे तर अनेक भारतीय सर्रास विमानाने प्रवास करतात. या प्रवासात जागं होणारं कुतूहल बरेचदा कोड्यात पाडतं. पण समाधानकारक उत्तरं मिळत नाहीत. असाच एक प्रश्न आपल्यापैकी अनेकांना पडतो पण उत्तर मिळत नाही. लँड होताना विमानांच्या पंखांजवळ लाल आणि हिरवे दिवे लागलेले दिसतात.



हा तीव्र प्रकाश म्हणजे जमिनीवर उतरण्यापूर्वीचा संदेश असतो. जास्त तीव्रतेचे लाल लाईट्स विमानाच्या डाव्या पंखाशी असतात तर हिरवे लाईट्स विमानाच्या उजव्या पंखाशी असतात. चुकीच्या संदेशांमुळे विमान उतरण्याच्या मार्गामध्ये एखादं विमानं असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा वेळी मोठ्या दुर्घटनेचा धोका असतो. असे अपघात टाळण्यासाठी या लाईट्सचा उपयोग होतो.

आरोग्यमंत्र

## मिळतील अनेक लाभ

रोजच्या जेवणात त्याच त्याच भाज्या एकाच पद्धतीनं न शिजवता वेगवेगळ्या भाज्या वेगवेगळ्या पद्धतीनं करुन खाण्यानं रुचीपालट होऊन जेवणातला आनंद द्विगुणीत होतोच खेरीज भाज्यांमधून सर्व प्रकारचे पोषक घटक मिळाल्यानं आरोग्यासही लाभ होतो. याच हेतूनं आज अधिक माहिती घेऊ या.



दररोज जेवणामध्ये टोमॅटोचा वापर अवश्य करावा. टोमॅटोमध्ये लायकोपेन हा घटक असून तो शरीराची झीज रोखतो आणि तारुण्याचं रक्षण करतो. म्हणून नियमित टोमॅटो खाणाऱ्यांची त्वचा आणि केस तजेलदार असतात. मधुमेहाच्या रुग्णामध्ये ब्लड शुगरचे प्रमाण समतोल राखण्यासाठी टोमॅटो खाणे उपयुक्त ठरू शकते. आजारानंतर आलेला थकवा दूर करण्यासाठी टोमॅटो सर्वात चांगला पर्याय आहे. कोबीमध्येदेखील विविध प्रकारची पोषणमूल्य आहेत. आदिवासी लोक लहान मुलांसाठी कोबीचे सेवन गुणकारी मानतात. ८ ते १० महिने वय असणाऱ्या मुलांचे वजन कमी असल्यास त्यांना अर्धा ते एक कप कोबीचा रस प्यायला दिल्यास वजन वाढण्यास मदत होते. कोबीची पाने गोड, शीतल, मूत्रल आणि कृमिनाशक आहेत. पोटदुखी, त्वचाविकार, दमा आणि ताप यावर कोबीची पानं गुणकारी ठरत असल्याचा उल्लेख आयुर्वेदात आढळतो. हिरड्यांच्या रोगावर कोबीची कच्ची पाने चघळणे उपयुक्त ठरते.

### पंचांग

**सोमवार, २९ डिसेंबर २०२२**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष शु. ९, चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : रेवती/अश्विनी,
योग : परिघ/ शिव
सूर्योदय ७.१३ सूर्यास्त १८.०९

### फॉरवर्डस

**कभी हम तो कभी वक़्त हमसें जीत गया...**

**इसी ख़ेल में एक साल औऱ बीत गया...!**

### फिटनेस फंडा

दोस्तांनो, नव्या वर्षांचं काउंटडाउन सुरू झालं आहे. नव्या वर्षात संकल्पांचा पाऊस पडतो. पहिले १० ते १५ दिवस ते अंमलातही येतात. पण नंतर पहिले पाढे पंचावन्न! पण यंदा असा गलथानपणा करु नका. नववर्षांच्या संकल्पांमध्ये फिटनेसला पहिला क्रमांक द्यायला हवा. फिटनेस हा एक प्रवास आहे जो सातत्यपूर्ण पद्धतीने करायला हवा. काही महिने किंवा वर्षभर प्रयत्न करून काहीच होत नाही. फिटनेसचा फंडा अंगवळणी पडायला हवा. तंदुरूस्तीचं उद्दिष्टं नव्या वर्षापुरतं नाही तर आयुष्यभरासाठी असायला हवं. यासाठी काय करता येईल? पाहू या. **(क्रमशः)**

फिटनेस फंडा

## 'वजनदार' व्हा बिनधास्त!

दोस्तांनो, मनात आलं म्हणून किंवा कोणाचं तरी ऐकून वजन कमी करणं योग्य नाही. यामुळे तुम्ही आजारी पडू शकता. म्हणूनच आपलं वजन योग्य आहे हे कसं ओळखावं याविषयी...

✻ दररोज उत्साही आणि आनंदी असणं हे तंदुरुस्त असण्याचं लक्षण असतं. तुम्ही उत्साहाने सळसळत असता. तुम्हाला कसलाही कंटाळा येत नाही.



✻ तुमचं वजन फार वाढत नसेल किंवा कमीही होत नसेल तर शरीराला तुमचं सध्याचं वजन योग्य वाटत असल्याचं समजावं.

✻ तुम्ही विश्रांती घेत असताना हृदयाची गती मोजा. या गतीवरून तुम्हाला तुमच्या तंदुरूस्तीची कल्पना येईल. विश्रांतीदरम्यान हृदयाचे कमी ठोके पडणं हे तंदुरुस्तीचं लक्षण असतं.

✻ कंबरेचा आकार कमी असायला हवा. कंबरेचा घेर वाढला तर तुम्हाला मधुमेह, हृदयविकार होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे कंबरेचा घेर वाढणार नाही याची काळजी घ्या.

✻ तुम्हाला आतून आनंदी आणि उत्साही वाटायला हवं. तुम्ही निरोगी, आनंदी आणि उत्साही असाल तर वजनाची काळजी सोडून द्या.

खेचाखेची

## असं समजा...

**आजोबा** : मास्तर, माझा नातू अभ्यासात कसा आहे?

.
.
.
.
.
.
.

**शिक्षक** : आजोबा, असं समजा की, आर्यभट्टनं शून्याचा शोध ह्याच्यासाठीच लावला होता.

### जीके टेस्ट

साळींदर किंवा साळू नावाचा काटेरी शरीर असलेला हा प्राणी धोकादायक वाटतो. आशिया तसंच आफ्रिकेत आढळणारे साळू आकाराने मोठे, बुटके आणि लहान पायांचे असतात. त्यांना एक छोटीशी शेपटी असते. या प्राण्याच्या शरीरावर काटेरी केस असतात. यामुळे स्वतःचं रक्षण करणं त्यांना सहज शक्य होतं. शरीर हलवल्यावर काही काटे गळून पडतात. पण साळू शत्रूवर काटे फेकू शकतो, हा समज पूर्णपणे चुकीचा आहे. भारतीय साळू मध्य भारतातल्या उष्णकटिबंधीय, पानझडी जंगलं, डोंगराळ भाग तसंच दऱ्याखोऱ्यांमध्ये आढळतात. साळूचा बराचसा काळ बिळातच जातो. हा प्राणी फार काळ बाहेर राहात नाही. साळू डुकरासारखा घोगरा आवाज काढते.

स्मार्ट टॉक

## फेशियल केल्यानंतर...


फेशियल केल्यानंतर त्वचा संवेदनशील होते. अशा वेळी नीट देखभाल करावी लागते. ही काळजी घेतली नाही तर चेहरा निस्तेज दिसू लागतो. विशेषतः महागडं गोल्ड फेशियल केलं असेल तर त्वचेची कशी काळजी घ्यायची याविषयी...



✻ मेक अप त्वचेला अगदी कमी कालावधीसाठी उजळपणा देतो. त्यामुळे त्याचा अतिरेक करू नये. त्यातही गोल्ड फेशियल केल्यानंतर लगेच मेक अप करणं टाळावं. ✻ फेशियलमुळे त्वचेवरची छिद्र उघडतात. पण चेहऱ्यावर मेक अप थापल्यानंतर तो आत शोषला जाऊन त्वचेवर मुरमं यायला सुरूवात होते. म्हणूनच गरज असल्यास अगदी सौम्य मेक अप करा. घरी आल्यावर तो काढून टाका. त्यानंतर चेहऱ्यावर गुलाबपाणी लावा. ✻ फेशियलनंतर बॉडी स्पा करू नका. या प्रक्रियेत शरीराला वाफ दिली जाते. यामुळे त्वचा अधिकच संवेदनशील बनते. ✻ चेहरा चमकवल्यानंतर किमान आठवडाभर कडक उन्हात जाणं टाळा. यामुळे चेहऱ्यावर मुरमे येऊ शकतात.

या टिप्स वापरून फेशियलनंतरही चेहऱ्याचा उजळपणा आणि तजेला टिकवून ठेवता येईल.

# शब्दकोडे क्रमांक २११५



**आडवे शब्द :-**

१) पुष्कळ वेळा
४) बासरी
६) वीस मणाचे माप
७) अश्लील, ✻✻✻✻ विचकट
९) रस्ता, सडक
१०) धुसफूस जिवाला होणारा त्रास
१२) गेरू
१३) चोपडी
१४) नवरदेव
१६) बरेवाईट, मागेपुढे करणे, सरसनिरस
१७) शूर
१९) छोटी वस्ती
२०) संतोष, तृप्ती
२२) बगळा
२३) सोन्याची साखळी
२५) दंश
२६) पैंजण
२८) भीती
३०) क्ष किरण
३१) पाकळी, पान
३२) मत्सर
३३) दावानल
३४) मुलायम, मऊ, तलम कापड
३६) पुरुष
३८) विनय
३९) राख
४१) मोठी नदी
४२) माफ
४३) जखमेवर चोपडायचा औषधी प्रकार
४४) पृथ्वी
४६) लक्ष्मीचे एक नाव
४८) मीठ
५०) उत्सव
५१) वडाचे झाड
५८) धाकटा
६०) नारळाचे झाड
६१) अर्धी ओंजळ
६२) रंग बदलणारा प्राणी
६४) अर्धवर्तुळाकार
६६) तरुण
६७) शरीरावर उमटलेली माराची खूण
६८) रोखलेली नजर
६९) सप्तस्वरातील पहिला स्वर
७०) नवा, न वापरलेला
७१) पूगीफल
७४) एक सुगंधी वनस्पती
७६) दिवस
७८) सारखा
७९) मोठी उथळ वाटी
८०) देव आनंदचा एक चित्रपट
८१) कमळ
८२) कापसाची बी

**उभे शब्द :-**

१) अवास्तव, गैरवाजवी
२) बळ, दम
३) देणगीपत्र
४) गवताचे पान
५) पूर्वज
६) जमिनीचा मोठा भाग
७) हिंमत, धैर्य
८) पोथीतील शेवटचा अध्याय
११) होडी
१५) बातमी
१८) खोडण्याचे साधन
१९) श्रीविष्णूचे बटु रुप
२१) संकटसमयी देवाला बोलाविणे
२४) श्रीमंत, दैववान
२६) दिल्लीच्या विमानतळाचे नाव
२७) वल्लरी
२८) बाराचा समूह (इं.)
२९) तरुण आणि शूर
३१) चिखलाची जमीन
३४) अंतःकरण
३५) (रोगाची) चाहूल
३७) रमविणारा, पती
४०) खारट पदार्थ
४५) दक्षतेचा इशारा
४७) खवा
४९) बारा महिन्याचा काळ
५०) एका मागून एक घातलेले घाव
५२) रोखलेली नजर
५४) माल, चीज वस्तू
५५) मत्स्य
५६) बारीक दगड
५७) श्वसनेंद्रिय
५९) लाजणारा
६१) अट, परंतु
६३) वस्तुंची यादी
६५) मन, मनातील विचार
६७) उपवासाचे तांदूळ
७२) पर्ण
७३) ढोंगी, खोटे खोटे वागणारा
७५) मक्केच्या मशिदीतील पवित्र दगड
७६) दिवस, घाव
७७) आवड, रुची, द्रवपदार्थ
७९) पावसाची झड

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गं | गा | ज | ळी | | कं | | वा | रे | मा | प | | धं | | अ |
| ध | डा | क्र | | पा | द | चा | री | | न | | स | दा | शि | व |
| र्व | | त | या | री | | रा | | स | व | ल | त | | र | स |
| | क | ना | त | | | चु | ल | ता | | हा | त | मा | ग | |
| स | | क्र | ना | को | प | रा | | र | द | न | | स | ण | क |
| मा | सा | | म | | द | | स | | | स | ट | | ती | र |
| ज | य | ज | य | क्र | र | | द्वा | | स | र | क | त | | डू |
| कं | | हा | | स | मो | र | | मो | र | | म | न | न | |
| ट | पा | ल | | व | ड | वा | न | ल | | ना | क | | र | वा |
| क | व | | गो | | | न | र | क | वा | स | | सा | व | र |
| | न | स | | क | ल | गी | | री | | क्र | ल | ह | र | ण |
| वा | | र | य | ता | वा | | क | ण | व | | ख | स | | |
| स | | स | म | र | | सा | ल | | न | व | ल | | शा | क |
| क | ल | क | ल | | हे | | र | ज | क | | खी | र | | वा |
| ट | | ट | | धा | वा | धा | व | | र | | त | ड | फ | ड |

## महावितरण वीज कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार : राजेंद्र पवार



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुरक्षा साधने देणार असल्याची माहिती महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी पुणे येथे दिली.

महावितरणच्या सांघिक कार्यालयातर्फे पुणे परिमंडल येथे अत्याधुनिक सुरक्षा साधनांच्या प्रात्यक्षिकांच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. पहिल्या दिवशी कंपनीत कार्यरत असलेल्या प्रमुख औद्योगिक संघटनांच्या शिखर पदाधिकारी, व्यवस्थापनातील वरिष्ठ अभियंते व अधिकारी यांच्यापुढे रास्ता पेठ उपकेंद्रात, तर दुसऱ्या दिवशी पद्मावती येथील २२/११ केव्ही उपकेंद्रात परिमंडलातील अभियंते व वीज कर्मचाऱ्यांपुढे सुरक्षा साधनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

यावेळी प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सुनील काकडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व वीज कर्मचारी उपस्थिती होते.

## दानापूर रेल्वे आता नाशिकरोडहून

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** गाडी क्रमांक ०१०५३ देवळाली-दानापूर शेतकरी समृद्धी विशेष गाडी दि. २७ डिसेंबरपासून देवळाली रेल्वे स्थानकाऐवजी नाशिकरोड येथून सुटत आहे.

भुसावळ विभागातील देवळाली स्थानक परिसरात कुंभमेळा अनुषंगाने सुरू असलेल्या विविध विकासात्मक व देखभाल कामांमुळे दि. ३ जानेवारी २०२६ पर्यंत देवळालीऐवजी नाशिकरोड स्थानकातून आपल्या नियोजित वेळेत सुटेल. प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना या तात्पुरत्या बदलाची दखल घ्यावी व गैरसोय टाळण्यासाठी वेळेआधी नाशिकरोड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

सोमवार
२९/१२/२०२५
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| २ | ४ | ८ |
| १२९ | १३० | ३५० |
| ४८० | ६८० | ४५९ |
| २४ | ४२ | ८२ |
| २८ | ४६ | ८६ |

सोमवार
२९/१२/२०२५
मुंबई शुभअंक

| | | |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |
| १६८ | ४४८ | १२४ |
| २४९ | १२३ | ३५९ |
| ५७ | ६२ | ७३ |
| ५९ | ६४ | ७५ |


## छोटी जाहिरात

### ज्योतिष

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# पतंगोत्सव साजरा करताना स्वत:सह इतरांचीही घ्यावी काळजी

## जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे नववर्ष शुभेच्छा देत आवाहन

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा)** :- मकरसंक्रांत आणि पतंगोत्सवाचे अतुट नाते आहे. नाशिक जिल्ह्यात पतंगोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो; मात्र हा उत्सव साजरा करताना तो आपल्यासह इतरांसाठीही सुरक्षित राहील याची प्रत्येकाने खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी करीत नाशिककरांना येणाऱ्या नववर्षासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी प्रसाद यांनी जिल्ह्यातील नागरिक आणि विद्यार्थ्यांना नववर्ष आणि मकरसंक्रांतीच्या शुभेच्छा देणारे पत्र लिहिले आहे. त्यात म्हटले आहे, की नववर्षातील पहिला सण म्हणजे मकरसंक्रांत होय. मकरसंक्रांत आणि तिळगुळाबरोबरच पतंगोत्सवाचेही नाते घट्ट आहे. तिळगुळाने स्नेहाचा गोडवा आणि आरोग्याची संपन्नता वाढते, तर पतंग उडविण्यामुळे तन आणि मनाची ऊर्जा द्विगुणित होते; मात्र पतंगोत्सव साजरा करताना आपल्यासह अन्य व्यक्ती, पशू-पक्षी सुरक्षित राहतील, याचीही काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

पतंगाच्या मांजामुळे अपघात होत आहेत. वाहनचालकांचा गळा कापला जाणे, खोलवर जखमा होण्याबरोबरच काही जणांना प्राणासही मुकावे लागल्याच्या घटना घडतात. पतंग उडविण्यात दंग राहिल्याने उंच छतावरून पडून जखमी होणे किंवा प्राणाला मुकावे लागण्याच्या घटनाही घडल्या आहेत. पतंगाचा मांजा जसा मानवासाठी धोकेदायक आहे, तसाच तो पक्ष्यांसाठी जीवघेणा आहे. त्यांचे पंख कापले जाणे, पायांना जखमा होणे वेळप्रसंगी या मुक्या पक्ष्यांना मांजापायी जीवही गमवावा लागतो.

या सर्व पार्श्वभूमीवर पतंगोत्सव आनंददायी आणि अपघात विरहित करण्यासाठी काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी नॉयलॉन मांजाचा वापरच करू नका. यामुळे स्वत:सह इतरांना जखमी होण्यापासून वाचविता येईल. रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर पतंग उडवू नका, झाडांजवळ पतंग उडवू नका. पतंग शक्यतो जमिनीवरून, मैदानावरून उडवा. यामुळे पडण्याचा किंवा जखमी होण्याचा धोका नसतो. वीजतारांजवळ पतंग उडवू नका, सूर्यकिरणांच्या दिशेने पाहून पतंग उडवीत असाल, तर डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगलचा जरूर वापर करावा. पतंग उडवून झाल्यावर पतंग, मांजाचे तुकडे उचलून त्यांची सुरक्षितरीत्या विल्हेवाट लावण्याचेही आवाहन जिल्हाधिकारी प्रसाद यांनी नाशिककरांना केले आहे.

# विद्युत भवनात वीर बालदिनी अभिवादन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** महावितरणच्या नाशिक परिमंडळ कार्यालयातील विद्युत भवन येथे गुरू गोविंदसिंह यांच्या शहीद सुपुत्रांना वीर बालदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते चार साहिबजादे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता देवेंद्र सायनेकर, वरिष्ठ व्यवस्थापक मुरलीधर गवळी, व्यवस्थापक हेमंत भामरे, उपकार्यकारी अभियंता दीपक गडलिंग, जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महिलेचे मंगळसूत्र बळजबरीने खेचले

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** जेवणानंतर शतपावली करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीस्वाराने बळजबरीने खेचून नेल्याची घटना मखमलाबाद येथे घडली.

फिर्यादी पूजा मच्छिंद्र चांगले (रा. महालक्ष्मीनगर, मखमलाबाद रोड) या काल (दि. २६) रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास जेवणानंतर घराच्या बाहेर फिरण्यासाठी गेल्या होत्या. विरुद्ध बाजूने भरधाव दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांपैकी पाठीमागे बसलेल्या इसमाने चांगले यांच्या गळ्यातील १ लाख २५ हजार रुपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून अंधाराचा फायदा घेऊन चोरून नेले. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गावित करीत आहेत.

# सायबर पालकत्त्व ही संकल्पना काळाची गरज : ज्येष्ठ पत्रकार मुक्ता चैतन्य

## सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथालय महोत्सवात प्रतिपादन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** आजचे जग डिजिटल आहे. वेगवान, आकर्षक आणि तितकेच धोकादायकही. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाने मानवी जीवन अधिक सुलभ केले असले, तरी त्याचबरोबर अनेक अदृश्य आव्हाने उभी केली आहेत. या पार्श्वभूमीवर सायबर पालकत्व ही संकल्पना काळाची गरज बनली असल्याचे ज्येष्ठ पत्रकार मुक्ता चैतन्य यांनी सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथालय महोत्सवात व्याख्यानातून उलगडले. अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष प्रा. डॉ. सुनील कुटे होते.

पत्रकार मुक्ता चैतन्य म्हणाल्या, आजची मुले ही जन्मजात 'डिजिटल पिढी' आहे. त्यांचा खेळ, शिक्षण, मैत्री आणि भावना सर्व काही स्क्रीनभोवती फिरत आहे. मात्र या डिजिटल विश्वात सुरक्षितता, मर्यादा आणि मूल्यांची जपणूक न झाल्यास बालमनावर गंभीर परिणाम होऊ शकतात. ऑनलाईन व्यसन, सायबर गुन्हे, चुकीची माहिती, गोपनीयतेचे उल्लंघन आणि मानसिक अस्थैर्य ही आजच्या पालकांसमोरील मोठी आव्हाने आहेत.

मुक्ता चैतन्य यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला. पालकत्व म्हणजे केवळ नियंत्रण नव्हे, तर समजून घेणे आणि संवाद साधणे. मुलांच्या हातातील मोबाईल काढून घेणे हा उपाय नाही; तर त्या मोबाईलमधील जग पालकांनी समजून घेणे अधिक गरजेचे आहे. विश्वास, संवाद आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातूनच मुलांना डिजिटल माध्यमांचा जबाबदार वापर शिकविता येईल.

शिक्षक, पालक आणि समाज यांनी मिळून सुरक्षित डिजिटल संस्कृती निर्माण केल्याशिवाय पुढील पिढीचे भविष्य सुदृढ होणार नाही. तंत्रज्ञान टाळणे शक्य नाही; मात्र त्याचा विवेकपूर्ण वापर शिकविणे ही आजची खरी जबाबदारी आहे. हा संदेश या व्याख्यानातून त्यांनी दिला. डिजिटल युगात पालकत्वाची व्याख्या बदलत असताना, अशा विचारप्रवर्तक व्याख्यानातून समाज अधिक सजग होईल, असेही त्यांनी सांगितले. स्वागत व प्रास्ताविक कार्याध्यक्ष संजय करंजकर यांनी केले. परिचय ग्रंथ सचिव देवदत्त जोशी यांनी करून दिला. सूत्रसंचालन सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ यांनी केले. सदस्य प्रशांत जुन्नरे यांनी आभार मानले. यावेळी अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष डॉ. विक्रांत वैद्य, सांस्कृतिक सचिव जयप्रकाश जातेगावकर, पुस्तक मित्रमंडळप्रमुख मंगेश मालपाठक, व्यवस्थापक दिलीप अहिरे, सहाय्यक व्यवस्थापक योगिनी जोशी, संजय रत्नपारखी, दिलीप बोरसे, कीर्ती नागरे, अनिता नगरकर व राधा राऊत यांच्यासह सभासद व वाचक उपस्थित होते.

# व्यापाऱ्याला जिवे मारण्याची धमकी देऊन लुटणाऱ्या मुख्य आरोपीला अटक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** ५ लाख रुपये घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याला जिवे मारण्याची धमकी देऊन लुटणाऱ्या आरोपीला अंबडच्या गुन्हे शाखा युनिटने पनवेल येथून तीन दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर अटक केली आहे.



किशोर बाबूराव वाकोडे (वय २५, रा. शिवाजी चौक, भद्रकाली, नाशिक) असे अटक केलेल्या मुख्य आरोपीचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी, की दि. १ डिसेंबर रोजी फिर्यादी प्रवीणभाई माणिकलाल दवे (वय ६५, रा. पिंपळगाव बसवंत) हे व्यापाऱ्यांना पैसे देण्यासाठी पिंपळगाव येथून ५ लाख रुपये घेऊन निघाले होते. सायंकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास ते आडगाव नाक्यावर बसमधून उतरले. पुढे ते एका रिक्षात बसून जात असताना पंचमुखी हनुमान मंदिराजवळ ते आले असता रिक्षातील दोन अनोळखी इसमांपैकी एकाने त्यांचे हात पकडून दुसऱ्याने त्यांच्या डोक्याला काहीतरी वस्तू लावून जिवे मारण्याची धमकी दिली. नंतर आरोपीने त्याच्या हातातील धारदार वस्तूने त्यांच्या बरगडीवर मारत त्यांच्या हातातून पैशांची बॅग हिसकावून घेत त्यांना चालत्या रिक्षातून ढकलून दिले. याप्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना गुन्हे शाखा अंबड युनिटचे पोलीस उपनिरीक्षक व इतर कर्मचारी तीन दिवसांपासून आरोपीचा शोध घेण्यासाठी अथक परिश्रम घेत होते. आरोपी हा उज्जैन, इंदौर, मध्यप्रदेश, बिदर, कर्नाटक, पुणे, नवी मुंबई, पनवेल येथे पोलिसांना चकवा देऊन फिरत असल्याची माहिती तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने पोलिसांना मिळाली. त्या अनुषंगाने पोलिसांनी पनवेल मधील एका चाळीतून शिताफीने ताब्यात घेतले. आरोपी किशोर वाकोडेवर नाशिकमध्ये विविध पोलीस ठाण्यांत १२ गुन्हे दाखल आहेत.

त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर पुढील कारवाईसाठी त्याला पंचवटी पोलिसांच्या हवाली करण्यात आले.

# विश्वकर्मा मंदिर ट्रस्टचा राज्यस्तरीय वधू-वर पालक मेळावा संपन्न

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) ह्ल:-** विश्वकर्मा मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय वधू-वर पालक परिचय मेळावा मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडला.

समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती व त्यांच्या पालकांसाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास अध्यक्ष संदेश देवकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, नारायण क्षीरसागर, राजेंद्र जाधव, आनंद सूर्यवंशी व विजय शार्दूल यांच्यासह विश्वस्त मंडळातील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका सुजाता शिरसाठ (भगूर), पल्लवी शिरसाठ (त्र्यंबकेश्वर) तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुश्री बोराडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांनी आपल्या भाषणात सामाजिक कार्यकर्त्यांच्या परिश्रमांना वधू-वरांच्या पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करत संस्थेच्या समाजोन्नतीसाठी सुरू असलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. सचिव राजेंद्र भालेराव यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या आजवरच्या कार्याचा सविस्तर आढावा मांडला. वधू नोंदणीची घटती संख्या लक्षात घेता भविष्यात वधू-वर मेळावा घ्यावा की नाही, अशा संभ्रमावस्थेत संस्थाचालक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या मेळाव्यास एकूण ३५० वधू-वरांनी नोंदणी केली असून त्यापैकी २१० वधू-वरांनी प्रत्यक्ष मंचावर आपला परिचय करून दिला. परिचयानंतर वधू-वर पुस्तिकेचे विश्वस्त मंडळाच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले व उपस्थित वधू-वरांना ती वितरीत करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा भालेराव, शुभांगी जगताप, तसेच महिला कार्यकर्त्या भगिनींनी केले. उपाध्यक्ष विलास सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बाळकृष्ण दिघे, भास्कर घायतड, निवृत्ती बोराडे, विजय जाधव, किशोर भालेराव, विजय दिघे, रमेश गाडेकर यांच्यासह विश्वस्त मंडळ सदस्य तसेच किशोर दिवेकर, दशरथ शिरसाट, विठ्ठल जगताप, सुनीता जगताप, वैशाली शिंदे, संगीता शिरसाट, भानुदास क्षीरसागर, कचेश्वर जगताप, रामदास सूर्यवंशी, तुळशीराम कदम, धनंजय शिंदे, गोविंद शिरसाट आदींनी परिश्रम घेतले.

# आदर्श शिशुविहार शाळेत नाताळ सण साजरा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** आदर्श शिशुविहार व बालशिक्षण मंदिर, गोरेराम लेन येथे नाताळ सणाचा कार्यक्रम चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. सर्वधर्मसमभाव या तत्त्वाला अनुसरून शाळेत प्रत्येक सणाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना संस्कार दिले जातात.

याप्रसंगी मुख्याध्यापक के. के. तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली नाताळ सणाचे आयोजन करण्यात आले होते. संगीता वाटपाडे यांनी विद्यार्थ्यांना नाताळ सणाचे महत्त्व, परंपरा आणि या सणामागील संदेश सविस्तर सांगितला. लहान मुलांनी या माहितीत खूप रस घेतला आणि सणाचा आनंद लुटला.

कार्यक्रमाचे सौंदर्य वाढविणारे फलक लेखन अर्चना पगार आणि मनीषा काळे यांनी तयार केले होते. शाळेच्या सजावटीत आणि कार्यक्रमाच्या नियोजनात उज्वला ठाकरे, मनीषा मते व छाया सोनवणे यांनी सहकार्य केले.

शाळा व्यवस्थापनाने सांगितले, की बालवयातील मुलांना विविध धर्मांच्या सणांची ओळख करून देणे हा त्यांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. यामुळे मुलांमध्ये सहिष्णुता, प्रेम आणि एकतेची भावना रुजते. आदर्श शिशुविहार व बालशिक्षण मंदिरात या तत्त्वाचे पालन केले जाते आणि प्रत्येक सण मुलांसह आनंदाने साजरा केला जातो. याप्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# भावभक्तीने न्हालेला संत मीराबाई यांचा गीत संगीतमय आध्यात्मिक प्रवास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** संत मीराबाई यांच्या जीवनावर आधारित भक्तीमय गीतह्वसंगीताचा विशेष कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात पार पडला.

राजघराण्यात जन्मलेली व राजपुत्राशी विवाहबद्ध झालेली राजकुमारी मीरा हिचा गृहस्थ जीवनातून संतत्वाकडे झालेला अद्वितीय प्रवास, जणू एखाद्या गूढ व दिव्य कथेसारखा, या कार्यक्रमातून रसिकांसमोर उलगडला गेला. भाव, भक्ती आणि अध्यात्म यांचा सुरेख संगम साधणारा हा कार्यक्रम रसिकांच्या मनाला स्पर्शून गेला.

या कार्यक्रमाच्या प्रस्तुतकर्त्या विख्यात गायिका, कवयित्री व संत साहित्याच्या अभ्यासिका विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी सुमधुर गायनातून संत मीराबाईंच्या भक्तिभावाचे प्रभावी दर्शन निरुपणासह घडविले. कार्यक्रमाची सुरुवात व शेवट 'गोविंद बोलो हरी गोपाल बोलो' या भक्तिगजराने करण्यात आला. कार्यक्रमात विविध रचनांचे सादरीकरण करण्यात आले. त्यात संस्कृत कृष्णस्तुती (राग भीमपलास), म्हारो प्रणाम बांके बिहारी जी (राग यमन), म्हारा री गिरधर गोपाल (राग जैत मल्हार), गढ से तो मीराबाई उतरी (राग देस), ठाणे कांई कांई बोल सुनावा (मिश्र नंद), करम की गती न्यारी संतो (राग हंसध्वनी), उड जा रे कागा (राग भिन्न षड्ज), माई माई कैसे जियू (मिश्र अल्हैया बिलावल), किनू संग खेलू होली (राग यमन), माई म्हाणो सुपनामा परण्या (मिश्र भूप), तसेच चाला वही देस आदी अभंग व पदे सादर करण्यात आली. प्रत्येक रचनेतून संत मीराबाईंची कृष्णभक्ती, विरह, समर्पण आणि वैराग्य परिणामकारकपणे व्यक्त झाले. उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध होऊन कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते.

हा कार्यक्रम आध्यात्मिक, सांगीतिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संस्मरणीय ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. हा कार्यक्रम नाशिकच्या रावत परिवाराने आयोजित केला होता.

# अभाविप पश्चिम महाराष्ट्र प्रांत अधिवेशनाच्या सभास्थळ मंडप कामाचे भूमिपूजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) पश्चिम महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनाच्या सभास्थळ मंडप उभारणीच्या कामाचे, स्थळाचे विधिवत् भूमिपूजन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांच्या हस्ते करण्यात आले.



ज्येष्ठ उद्योजक अशोक कटारिया, अधिवेशन स्वागत समितीचे अध्यक्ष जयंत भातांबरेकर, सचिव सागर वैद्य, प्रा. प्रदीप वाघ, व्यंकटेश अवसरकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अभाविप अधिवेशन हे केवळ एक विद्यार्थी एकत्रीकरण नसून समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याचा आवाज आहे. विद्यार्थी परिषदेच्या अधिवेशनात जे जे निर्णय घेतले गेले ते सर्व निर्णय अभाविपने प्रत्यक्षात आणले. देशाचे नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह अधिवेशनात घेतले गेलेले सर्व निर्णय हे समाजोपयोगी बदल घडवतात. हे अभाविपच्या अधिवेशनाचे महत्त्व आहे, असे संजय पाचपोर यांनी यावेळी सांगितले.

अभाविप राष्ट्रभक्त विद्यार्थी घडवणारी संघटना असून, परिषदेचे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार काढत अशोक कटारिया यांनी जुन्या स्मृतींना उजाळा दिला.

कार्यक्रमाला अभाविपचे पश्चिम महाराष्ट्र प्रदेश सहमंत्री मेघा शिरगावे, अमोल गायकवाड, रूपेश पाटील, खुशबू चांडक यांच्यासह नाशिक महानगरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ख्रिस्ती समाजबांधवांतर्फे नाताळ सण भक्तिभावाने साजरा

**मनमाड (भ्रमर वार्ताहर) :-** प्रभू येशू ख्रिस्त यांचा जन्मोत्सव ख्रिसमस मनमाड शहरातील विविध चर्चमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. येशू ख्रिस्तांच्या जन्मानिमित्त गौरव प्रार्थना, स्तुतीगायन व विशेष उपासनेचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक सजावट व लक्षवेधी विद्युत रोषणाईमुळे चर्च परिसर उजळून निघाला होता. शहरातील ख्रिस्ती समाजबांधवांनी हा पवित्र सण भक्तिभावाने आणि आनंदात साजरा केला.



येशू ख्रिस्तांचा जन्मदिन 'नाताळ' म्हणून जगभर साजरा केला जातो. मनमाड शहरातील कॅम्प परिसरात ख्रिस्ती बांधवांची वस्ती मोठ्या प्रमाणात असून याच भागात बहुतेक चर्च असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. शहरात सर्वत्र विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संत फ्रान्सिस झेवियर्स चर्च, संत बार्णबा चर्च, बेथेल चर्च, सेवेन्थ डे चर्च, तसेच एकलेसिया फेलोशिप चर्च यांसह इतर चर्चमध्ये नाताळनिमित्त येशू ख्रिस्तांचा जन्मदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नाताळची गीते सादर करण्यात आली. प्रार्थनेसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन झाले. ख्रिस्ती बांधवांनी हात जोडून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. चर्च परिसरात शुभेच्छा फलक लावण्यात आले होते. शहरातील विविध चर्चसह प्रत्येक ख्रिस्ती कुटुंबात येशू जन्मोत्सव साजरा झाला. नाताळच्या पार्श्वभूमीवर मागील काही दिवसांपासून चर्चमध्ये धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवण्यात येत होते. घराघरात दिव्यांची रोषणाई करून येशूंच्या जन्मप्रसंगाचे देखावे साकारण्यात आले. ख्रिसमस ट्री, काचेचे व प्लास्टिकचे बॉल, बर्फाचे क्रिस्टल्स, एंजल्स, गवत, माती, पुतळे व चित्रांच्या सहाय्याने येशू जन्माचे दृश्य सजवण्यात आले. दिवसभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम सुरू होते. नाताळच्या पूर्वसंध्येला सोशल मीडियावरूनही शुभेच्छांचा वर्षाव झाला. एसएमएस, व्हॉट्सअॅप व ट्विटरद्वारे नाताळच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# ग्रंथालय महोत्सवात सभासदांसाठी प्रश्नमंजूषा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** सार्वजनिक वाचनालयात सुरू असलेल्या ग्रंथालय महोत्सवाच्या निमित्ताने सभासदांसाठी आयोजित करण्यात आलेली प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात पार पडली.



या स्पर्धेत साहित्यिक, त्यांचे साहित्यिक कार्य व साहित्य परिचय यासह सामान्यज्ञान, विविध कविता व पुस्तके आणि त्यांचे लेखक याविषयी सहभागींच्या ज्ञानाची कसोटी पाहण्यात आली.

स्पर्धेदरम्यान मराठी साहित्य विश्वातील नामवंत साहित्यिक, त्यांच्या महत्त्वपूर्ण कृती, काव्यरचना तसेच विविध क्षेत्रांतील सामान्यज्ञानावर आधारित प्रश्न विचारण्यात आले. सभासदांनी मोठ्या आत्मविश्वासाने व अभ्यासपूर्ण उत्तरे देत स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदविला. वाचनाची गोडी, साहित्याविषयीची आवड आणि बौद्धिक कुतूहल वाढीस लागावे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन म्हणून पेन भेट देण्यात आले. वाचनालयाने राबविलेल्या या उपक्रमामुळे सभासदांमध्ये वाचनसंस्कृती वृद्धिंगत होण्यास हातभार लागला असून अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

ग्रंथालय महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या प्रश्नमंजूषा स्पर्धेमुळे वाचनालय परिसरात ज्ञान, साहित्य आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथ सचिव देवदत जोशी यांनी केले. सर्व उपस्थित मान्यवरांचा परिचय उपाध्यक्ष डॉ. सुनील कुटे यांनी करून दिला. यावेळी अर्थ सचिव गिरीश नातू, कवी प्रशांत केंदळे, डॉ. सायली आचार्य यांनी विविध विषयांवर प्रश्न विचारले. प्रश्नावलीच्या दोन फेऱ्या झाल्या. अंतिम फेरीत तीन स्पर्धक विजयी झाले व तीनही विजेत्यांना ग्रंथ घेण्यासाठी अनुक्रमे प्रथम १००० रु., द्वितीय ७५० रु. व तृतीयसाठी ५०० रुपयांचे कूपन ग्रंथ खरेदी करण्यासाठी देण्यात आले.

### बंडोपंत जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बक्षिसांचे वितरण

सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथ सचिव देवदत्त जोशी यांनी वाचनसंस्कृती वाढावी, वाचकांनी वाचनाची चालना मिळावी व वृद्धिंगत व्हावी, याकरिता आपले वडील कै. बंडोपंत जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विजयी स्पर्धकांना प्रत्येकी रोख रुपये १५०१ रु., द्वितीय क्रमांक १००१ रु. आणि तृतीय क्रमांक ५०१ रुपये बक्षिसांचे धनादेश देण्यात आले. प्रतिवर्षी देवदत्त जोशी यांच्याकडून ही पारितोषिके देण्यात येणार आहे, असेही यावेळी घोषित करण्यात आले.

यांचा झाला गौरव हे ठरले विजेते शुभम अहिरे (प्रथम), गणेश परदेशी (द्वितीय), रवींद्र आहेर (तृतीय).

याप्रसंगी उपाध्यक्ष वैद्य डॉ. विक्रांत जाधव, प्रा. डॉ. सुनील कुटे, कार्याध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, अर्थ सचिव गिरीश नातू, ग्रंथ सचिव देवदत्त जोशी, सांस्कृतिक सचिव जयप्रकाश जातेगावकर, सहाय्यक सांस्कृतिक सचिव प्रशांत जुन्नरे, पुस्तक मित्रमंडळप्रमुख मंगेश मालपाठक, मुख्य व्यवस्थापक दिलीप अहिरे, सहाय्यक व्यवस्थापक योगिनी जोशी, दिलीप बोरसे व संजय रत्नपारखी यांच्यासह नाशिक शहर परिसरातील रसिक उपस्थित होते.

# संपादकीय

## अस्तित्वाची लढाई

महाराष्ट्र नवनिर्माण सेना अन् उद्धव बाळासाहेब ठाकरेंच्या शिवसेनेचे मनोमिलन झाले अन् युतीची अधिकृत घोषणा दोन्ही पक्षांच्या प्रमुखांनी केली. मुंबईकरांसह राज्यातील बाळासाहेबांच्या चाहत्यांच्या मनात होते ते स्वप्न अखेर २० वर्षांनंतर पूर्ण झाले. दोन कुटुंबे एकत्र येतात, ही चांगलीच गोष्ट आहे; परंतु महाराष्ट्रातील राजकारणात मनसे व शिवसेना या दोन्ही पक्षांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. लोकसभा निवडणुकीत ठाकरेंच्या सेनेचे २० खासदार निवडून आले, तर विधानसभा निवडणुकीतही ठाकरेंना जनतेने काहीशी पसंती दिली; मात्र मनसेला शून्यातून बाहेर पडणे शक्य झाले नाही. आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले आहे. या निवडणुकीसाठी मराठी माणूस, मुंबई यासाठी मनसे व शिवसेनेची युती झाली, असा दावा दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. मुंबईसह महाराष्ट्राचे हित जपण्यासाठी मराठी माणूस टिकणे यासाठी दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. त्यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुका एकत्र लढविण्याची घोषणा केलेली आहे. त्यामुळे ठाकरे सेना व मनसे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे. मुंबई महानगरपालिकेत भगवा फडकवणे व राजकारणात आपला दबदबा कायम ठेवणे, हे मनसे व शिवसेनेसाठी मोठे आव्हान राहणार आहे. सन २०२४ मध्ये लोकसभा, विधानसभा निवडणुका पार पडल्या. आता राज्यातील मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह अन्य महानगरपालिकांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. या निवडणुकीत कोण विजयी होईल, हे १६ जानेवारीला निकालानंतर स्पष्ट होईलच. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक आणि राज्यातील अन्य महानगरपालिकेच्या निवडणुकीत यश प्राप्त करणे मनसे व शिवसेनेसाठी 'करो या मरो'सारखी लढाई असणार आहे. सध्या केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार सत्तेत आहे. त्यामुळे सन २०२९पर्यंत राज्यात व केंद्रात भाजपचे वर्चस्व कायम आहे, तर २०२९पर्यंत विरोधकांना आरोप-प्रत्यारोप करण्यातच धन्यता मानावी लागणार आहे; परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्या पक्षाचे अस्तित्व कायम ठेवण्याची ही ठाकरे बंधुंसाठी मोठी संधी आहे. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येणे हे महाराष्ट्र हितापेक्षा मनसे-शिवसेनेसाठी राजकीयदृष्ट्या अधिक फायद्याचे ठरणार आहे. शिवसेनेत असताना तीव्र अंतर्गत मतभेद उफाळून आल्यानंतर राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली. राज ठाकरे यांची बोलण्याची शैली बाळासाहेब ठाकरे यांच्याप्रमाणे असल्याने त्यांच्या सभेला तुफान गर्दी होते. शिवसेनेला जय महाराष्ट्र केल्यानंतर राज ठाकरे यांच्या मनसेने पहिली मुंबई महानगरपालिका निवडणूक लढवली व २८ नगरसेवक निवडून आले, तर विधानसभा निवडणुकीत १३ आमदार विजयी झाले. मात्र त्यानंतर हा विजयाचा धडाका त्यांना कायम राखता आला नाही. मनसेला उतरती कळा लागली आणि आजच्या घडीला ना एक आमदार ना एक नगरसेवक, अशी राजकीय स्थिती मनसेची झाली आहे. राज ठाकरे यांच्या सभेला गर्दी होत असली, तरी ती मतांमध्ये रूपांतर होत नसल्याचे आढळून आले आहे.

## रब्बी हंगामासाठी शेतकरी व पाणीवापर संस्थांना ६ जानेवारीपर्यंत पाणी अर्ज मुदत

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत येणारे कालवे, कालवा प्रकल्पांचे लाभक्षेत्र, जलाशय, बंधारे व नदी या ठिकाणावरून प्रवाही व उपसा सिंचनाचे पाणी घेऊ इच्छिणारे शेतकरी व पाणी वापर संस्थांनी दि. ६ जानेवारीपर्यंत आपले अर्ज नजीकच्या सिंचन शाखा कार्यालयात सादर करावे व रितसर पोहोच घ्यावी, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले आहे.

नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत गंगापूर डावा तट कालवा, गोदावरी उजवा व गोदावरी डावा तट कालवा, आळंदी डावा व आळंदी उजवा तट कालवा, पालखेड उजवा तट कालवा, कडवा तट कालवा, भोजापूर डावा कालवा या सर्व प्रकल्पांचे लाभक्षेत्र, तसेच वाकी, भाम, भावली, दारणा, मुकणे, वालदेवी , गंगापूर, कडवा, भोजापूर, गौतमी-गोदावरी, काश्यपी व आळंदी या धरणांचे जलाशय व नदी यावरून, तसेच दारणा-गोदावरी नदीचा भाग आणि गोदावरी नदीवरील या विभागांच्या आधिपत्याखालील एकूण १० कोल्हापूर बंधाऱ्यांचा समावेश होतो.

वरील प्रकल्पांत सिंचनासाठी उपलब्ध असणारे पाणी विचारात घेवून काही ठराविक क्षेत्रापर्यंत नमुना नंबर ७ प्रवर्गात रब्बी हंगाम सन २०२५-२६ साठी संरक्षित सिंचनाकरीता विहिरीच्या पाण्याची जोड असणाऱ्या सर्व प्रकाराच्या उभ्या पिकांसाठी पाणी देण्याचे प्रस्तावित आहे. शासन धोरणानुसार धरणातील उपलब्ध असलेले पाणी हे उन्हाळी हंगामाअखेर पुरवावे लागणार असल्याने प्रथम पिण्याच्या पाण्याची गरज भागवून उर्वरित पाण्यात शेतीच्या पिकासाठी व औद्योगिक कारखान्यांना पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यात पाणीपुरवठा करताना आर्वतन कालावधीत कमी जास्त अंतर करून पुरवावे लागते. यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व सूक्ष्म सिंचनावर अधिक भर द्यावा, याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घेऊनच अर्ज दाखल करावेत. अधिक माहितीसाठी नजीकच्या सिंचन शाखेशी अथवा नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही कार्यकारी अभियंता शहाणे यांनी कळविले आहे.

## लासलगाव येथे भगरीबाबांच्या ध्वनी मंत्रजप यंत्राचे लोकार्पण



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :-** लासलगाव व परिसरातील भाविकांचे आराध्यदैवत भगरीबाबा यांच्या ध्वनी मंत्रजप यंत्राचे लोकार्पण करण्यात आले.

भगरीबाबा हे लासलगाव व परीसरातील जनतेचे श्रद्धास्थान आणि प्रमुख दैवत असल्याने येथील भाविक भक्त आपल्या दैनंदिन कामकाजाची सुरुवात बाबांच्या दर्शनाने करतात. इतकेच नव्हे, तर कांद्यासाठी जगभर प्रसिद्ध असलेल्या लासलगाव बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील लिलावाचा प्रारंभ व समारोप आजही भगरीबाबांच्या जयघोषानेच होतो. येथील जनतेची, शेतकऱ्यांची व व्यापारी वर्गाची बाबांवरील असलेली अपार श्रद्धा विचारात घेऊन लासलगाव बाजार समितीने तिच्या मुख्य बाजार आवाराचे नाव भगरीबाबा मुख्य बाजार आवार असे ठेवलेले आहे.

दिवसेंदिवस बाबांच्या भक्त परिवारात मोठ्या संख्येने वाढ होत आहे. त्यामुळे लासलगाव येथील बेदमुथा परिवाराने भगरीबाबा यांच्या 'ओम् भगरी भगवते नम:' या मंत्राचे भाविकांसाठी फोटोसह ध्वनी जप यंत्र तयार केले. हा मंत्र इंडियन आयडॉल विजेते ऋषिकेश शेलार यांनी गायला असून, नाशिकचे जगदीश भांडगे यांनी रेकॉर्डिंग करून दिले. या मंत्राच्या प्रकाशनाप्रसंगी नानासाहेब चौधरी, गणपत बाबा नागरे, नरेंद्र वाढवणे, ऋषिकेश शेलार, रमेश शेठ संचेती यांच्यासह असंख्य भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन समीर देवढे यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांसह बेदमुथा परिवारातील सदस्यांचा भगरीबाबा स्मृती केंद्रातर्फे सत्कार करण्यात आला.

## शालेय राष्ट्रीय टेबलटेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कर्णधारपदी स्वरा करमरकर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित शालेय राष्ट्रीय टेबलटेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघात नाशिकची स्वरा करमरकर हिची कर्णधारपदी निवड करण्यात आली.



या स्पर्धा पेरांबुदूर (तामिळनाडू) येथे होणार आहेत. महाराष्ट्र संघात स्वरा करमरकरशिवाय रुचिता धारवटकर (पुणे), अन्वी करंबळेकर (ठाणे), अनिशा पात्रा (रायगड) व सई कुलकर्णी (पुणे) यांचा समावेश आहे. स्वरा ही प्रशिक्षक जय मोडक आणि पुनीत देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

तिच्या या निवडीबद्दल नाशिक जिल्हा टेबलटेनिस असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र छाजेड, उपाध्यक्ष शेखर भंडारी व मिलिंद कचोळे, सचिव राजेश भरवीरकर, कोषाध्यक्ष अभिषेक छाजेड, अलका कुलकर्णी, संजय वसंत, अलीअसगर आदमजी आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## ई-पीक पाहणी न केल्यास शासकीय अर्थसहाय्याला मुकावे लागणार

**येवला (भ्रमर वार्ताहर) :-** तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत पीक पाहणी नोंदविली नाही, अशा शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यास अडचण येऊ शकते. तेव्हा शेतकऱ्यांनी तत्काळ ई-पीक पाहणी नोंदवावी, असे आवाहन येवला तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

'माझी शेती, माझा सात-बारा, मीच नोंदविणार माझा पीक पेरा' या संकल्पनेनुसार ई-पीक पाहणी ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी प्ले स्टोअरवर जाऊन ही ई-पीक पाहणी ॲप डाऊनलोड करावे. त्यानंतर ई-पीक पाहणी नावाचे पेज तुमच्यासमोर ओपन होईल. त्यात ॲप वापरण्यासाठी लागणारी माहिती तेथे दिलेली असेल. या ॲपद्वारे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची माहिती स्वतः भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंद न केल्यास शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना, अनुदान वाटप व आपत्तीसंबंधी मिळणाऱ्या अर्थसहाय्याला शेतकऱ्यांना मुकावे लागण्याची वेळ येऊ शकते.

## सुकाकाथ मसाला

**साम्य**

शिक्षक म्हणाले, ''सांगा पाहू, विद्यार्थी व डॉक्टर यांच्यात काय साम्य आहे?'' बंड्या हात वर करून सांगतो, ''सर, ऑपरेशन झाल्यानंतर डॉक्टर आणि पेपर झाल्यानंतर विद्यार्थी एकच सांगतात.''

शिक्षकांनी विचारले, ''काय सांगतात?''

बंड्या म्हणाला, ''आम्ही आमच्या परीने प्रयत्न केले; परंतु आताच काहीही सांगू शकणार नाही.''

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

**अकबऱ्या**

**साहित्य :-** तांदूळ, तूप, दळलेली साखर, लोणी, निरसे दूध.

**कृती :-** तांदूळ तीन दिवस भिजत घालून ठेवावेत. नंतर धुऊन फडक्यावर कोरडे करून ते कुटावेत व अगदी बारीक पीठ करून घ्यावे. नंतर दोन वाट्या पिठात पाव वाटी तूप, पाव वाटी साखर व एक चमचा दूध घालून मीठ चांगले मळावे. लोणी घेऊन ते फडक्यात घालून चांगले दाबून अगर ब्लॉटिंग पेपरच्या सहाय्याने त्यातील पाणी शक्य तेवढे काढून टाकावे. वरील मळून ठेवलेल्या पिठात हे लोणी पाव वाटी मिसळून, खूप मळून घ्यावे. जितके जास्त मळावे, तितके चांगले. नंतर एका पानावर अगर प्लास्टिकच्या कागदावर तुपाचा हात लावून घ्यावा. वरील तयार करून ठेवलेल्या पिठाची सुपारीएवढी गोळी घेऊन, ती त्या पानावर अगर कागदावर जोराने आपटावी व हळूच सोडवून घेऊन तळणीत टाकून तळावी.

– ऐश्वर्या राजेंद्र काळे

## सोपे उपाय

चिनी मातीची भांडी फुटल्यानंतर ती घरच्या घरी सांधता येतात. त्यासाठी फुटलेले तुकडे एकत्र जुळवून प्रत्येक तुकड्याला फेव्हिकॉल लावून आठ तास तसेच ठेवावे.

## कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कंपनीतर्फे 'निवेश बस यात्रा'


**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** कॅनरा रोबेको ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने महाराष्ट्र व गोव्यामध्ये 'निवेश बस यात्रा' सुरू केली आहे. ज्याअंतर्गत म्युच्युअल फंड गुंतवणुकीबाबत जागरुकतेचा प्रसार करण्यात येईल आणि राज्यभरातील गुंतवणूकदारांना शिक्षित करण्यात येईल. या उपक्रमाचा म्युच्युअल फंड गुंतवणूक सोपी करण्याचा आणि राज्यांमध्ये आर्थिक शिक्षण देण्याचा मनसुबा आहे.

पुण्यापासून एक बस निघून नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, अकोला व नागपूर यांसह प्रमुख ठिकाणांपर्यंत प्रवास करीत शहरांमधील रहिवाशांमध्ये जागरुकतेचा प्रसार करेल. दुसरी बस कोल्हापूरमधून निघून रत्नागिरी, कणकवली, कुडाळ व सावंतवाडी येथे प्रवास करेल आणि गोव्यामध्ये या उपक्रमाचे समापन होईल.

कॅनरा रोबेको एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक (एमडी) व मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) रजनीश नरुला म्हणाले. ''निवेश बस यात्राचा प्रत्यक्ष समुदायांना आर्थिक शिक्षण देण्याचा मनसुबा आहे. केरळ, पंजाब, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, कर्नाटक, राजस्थान, तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा व आसाम अशा राज्यांपर्यंत पोहोचण्यासह आम्ही आता हा उपक्रम महाराष्ट्र व गोव्यामध्ये आणत आहोत.''

● **नाशिक :-** गेल्या काही दिवसांपासून शहरात पडलेला गारव्यामुळे नागरिक त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे. अतिगारव्यामुळे सर्दी, खोकला व ताप यांचे रुग्ण वाढत असून, अनेक दवाखान्यांमध्ये रुग्णांची गर्दी वाढत असल्याचे दिसून येत आहे.

## भ्रमर शब्दकोडे क्र. ३७४



**उभे शब्द :** १) अवकाशयान (इंग्रजीत) २) एक म्हण-** तो कान पिळी ३) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री ४) आठवण (हिंदीत) ५) फूल, मुलीचे एक नाव ६) थांगपत्ता ८) हळू, मंद गतीने ११) इंग्रजी मुळाक्षरातील अठरावे अक्षर १३) लग्न (हिंदीत) १५) हात, रक उलट लिहा १६) लिंबूपाण्याचे पेय १७) आईचा भाऊ १९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द २२) फायदा २३) लाकूड कापण्याचे एक साधन २६) एक मराठी न्यूज चॅनेल २८) पाच दुणे ३०) शर्थ, टअ उलट लिहा ३१) सूर्य, भास्कर ३३) उत्सवादरम्यान मंडळे गोळा करतात ती देणगी ३४) चलाख, सुस्तच्या विरूध्दार्थी शब्द ३६) मुस्लिम बांधवांची गाण्यांची मैफल ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) आईची बहीण ४०) दिल्लीच्या एक माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ४१) एक पक्षी ४३) एक म्हण-आधी पाया मग *** ४४) ससा आणि याची गोष्ट प्रसिध्द आहे ४५) उद्या (हिंदीत) ४७)स्व. गानसम्राज्ञी-** मंगेशकर

**आडवे शब्द :** १) प्रियांका गांधी यांचे पती -*** वड्रा ३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या कन्या ६) मुंबईलगतचा जिल्हा ७) एक फळ ८) छक्केपंजे माहीत नसलेला, स्वभावाने सरळमार्गी ९) धमकी देणे १०) एक म्हण-** करील ते राव काय करील ११) जावकच्या विरूध्दार्थी शब्द १२) गुंगी, बेहोशी १४) व्यवस्थित १६) दिलीप प्रभावळकर, यशवंत दत्त अभिनीत एक राजकीय चित्रपट १८) छोटी प्रवासी गाडी १९) सत्वांश, अर्क २०) राश उलट लिहा २१) आदरसत्कार, **पान २३) पाठीची मणक्यांची माळ, एक प्रसिध्द कविता २४) साईबाबांचे बोधवाक्य-*** मालिक एक २५) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास २७) वडील (इंग्रजीत) २९) तर उलट लिहा, मग्न ३०) निवडणुकीपूर्वी उमेदवाराने भरलेली रक्कम, डिपॉझिट (मराठीत) ३२) हातवारे करून केलेला अभिनय ३४) बसावयास अंथरतात ती ३५) कथेतील पंख असलेली स्त्री ३६) केस काळे करण्यासाठी करतात ते ३८) प्रवेशद्वारावर स्वागतासाठी उभारतात ती ४१) जल, उदक ४२) गोधडी ४३) कलावंत, अभिनेता ४५) छोटा हंडा ४६) प्रश्न (हिंदीत) ४८)भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते-*** गांधी ४९) सांगली जिल्ह्यातील एक तालुका, एक विधानसभा मतदारसंघ

**शब्दकोडे क्र. ३७३ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | दि | त्य | | रो | हि | त | | अ | ज | य | |
| व | न | | व | ह | म | | ग | ज | रा | | मुं |
| ड | | च | ल | न | | श | रा | ब | | दा | ब |
| | स | म | य | | स | र | डा | | जा | व | ई |
| ब | द | क | | गु | ला | म | | ग | ल | त | |
| ग | रा | | क | ला | म | | सा | म | ना | | ध |
| ळा | | ग | री | ब | | पा | ल | क | | गा | व |
| | क | ल | म | | पा | ड | स | | भो | ज | न |
| भा | र | त | | फ | त | वा | | उ | प | र | |
| क | डी | | बा | ल | क | | सा | प | ळा | | कं |
| री | | उ | द | क | | न | ग | मा | | रा | ग |
| | रू | मा | ल | | उं | दी | र | | का | म | ना |



भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त, तसेच भाजपाचे माजी खा. हरिश्चंद्र चव्हाण यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. वणी शहराध्यक्ष मयूर जैन यांच्या नेतृत्वाखाली संताजी इंग्रजी मीडीयम स्कूलच्या हॉलमध्ये प्रतिमापूजनाप्रसंगी ज्येष्ठ नेते प्रकाश बोरा, महेंद्र पारख, बाळासाहेब देशमुख, बाळासाहेब घडवजे, आबा मोरे, किशोर दिक्वाल, सूरज पंडित, मोहम्मद, ऋषभ बागरेचा यांच्यासह भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी.

## देवळ्याच्या शलाका शिरसाठची पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** येथील शलाका शिरसाठ-पवार हिची खडतर प्रशिक्षणानंतर पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाली. नाशिकला महाराष्ट्र पोलीस अकादमीत सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांच्या उपस्थितीत झालेल्या दीक्षांत समारंभात तिने शिस्तबद्ध संचलन करून संविधान आणि कर्तव्याची शपथ घेतली. शलाका या देवळा येथील कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक आर. एन. शिरसाठ व माध्यमिक शिक्षिका वनिता यांच्या कन्या आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सन २०२१ मध्ये संयुक्त गट- ब सेवा परीक्षेतून पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, शारीरिक चाचणी आणि मुलाखत या चार टप्प्यांतून शलाका शिरसाठ-पवार यांची एप्रिल २०२४ मध्ये पोलीस उपनिरीक्षकपदावर निवड झाली होती.

तिचा नोव्हेंबर २५ मध्ये सटाणा महाविद्यालयातील प्रा. स्वामी पवार यांच्याशी विवाह झाला. लग्नानंतर तिने २३ डिसेंबर २०२४ पासून नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या सत्र क्रमांक १२६ अंतर्गत अतिशय खडतर असे वर्षभराचे प्रशिक्षण पूर्ण केले. एकूण ३९० प्रशिक्षणार्थीमध्ये शलाकाने ९६ वा गुणानुक्रम मिळविला. शलाकाची पोलीस उपनिरीक्षकपदी झालेली निवड आणि खडतर असे प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल असंख्य मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.



मविप्रचे माजी संचालक डॉ. विश्राम निकम, प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर, मविप्र संचालक विजय पगार, देवळा बाजार समितीचे माजी सभापती योगेश आहेर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष पंडितराव निकम, नगरसेवक जितेंद्र आहेर, बाजार समितीचे संचालक शाहू शिरसाठ, देवळा एज्युकेशन सोसायटीच्या सचिव डॉ. मालती आहेर, प्रशासकीय अधिकारी बी. के. रौंदळ, प्रा. डॉ. सतीश ठाकरे डॉ. डी. के. आहेर, डॉ. वसंतराव आहेर, विजय पगार, प्रा. योगेश भामरे, डी. आर. अहिरे, बाबूलाल पवार, विजू अहिरे, पी. डी. सागर, एस. बी. काळे, भाऊसाहेब मगर, अशोक मगर, डॉ. अशोक सोनवणे, डॉ. पंकज निकम, डॉ. अरुण निकम, पद्माकर पाटील, दिलीप पाटील, आर. एस. निकम, शरद निकम, मनोज शिरसाठ आदींनी अभिनंदन केले आहे.

## सोन्याचांदीच्या उच्चांकामुळे वधू-वरपिते अडचणीत

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** शुक्रवारी एक तोळा सोन्याचा दर १ लाख ४२ हजार ६५० रुपये (२४ कॅरेट) पर्यंत वधारला. त्यामुळे विवाह ठरलेल्या वधू-वरपित्यांचे धाबे दणाणले आहेत. चांदी ही २ लाख ३६ हजार ९०० रुपये किलोपर्यंत पोहोचली आहे.

## विज्ञान प्रदर्शनात संताजी इंग्लिश मीडियम स्कूल प्रथम


**वणी (भ्रमर वार्ताहर) :-** येथील संताजी इंग्लिश मीडियम स्कूलने तालुकास्तरीय प्रदर्शनात आदिवासी गटात प्रथम क्रमांकाने यश संपादन केले.

सन २०२५- २६ शिक्षण विभाग पंचायत समिती दिंडोरी, तसेच एनआयकेएस इंग्लिश मीडियम शाळा उमराळे यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उमराळे येथे झाले.



अतिशय उत्साहात झालेल्या या प्रदर्शनात विद्यार्थी अथर्व सुदीप बुवा व विनिता नरपतकुमार मोदी, शिक्षिका वैष्णवी शर्मा यांना प्रथम पारितोषिक हे अन्नपुरवठा व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ व गटशिक्षणाधिकारी भाऊसाहेब चव्हाण आणि विस्तार अधिकारी चंद्रकांत गवळी यांच्या हस्ते देण्यात आले. यासाठी विज्ञान शिक्षिका वैष्णवी शर्मा, स्कूलच्या मुख्याध्यापक अनुपल्लवी मोहना व इतर सर्व शिक्षक वृंदाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाने मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष महेंद्र पारख, उपाध्यक्ष प्रवीण देवरे, सरचिटणीस देवीदास कोकाटे व पुष्पक पारख, संस्थेचे सर्व विश्वस्त, संचालक, सेवक प्रतिनिधी व शिक्षणाधिकारी यांनी यशस्वितांचे व शाळेचे अभिनंदन केले.

# डॉ. रामकृष्णदास महाराज हे समाजसुधारणेचा दीपस्तंभ : ना. गिरीश महाजन





**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर महाराजांचे कार्य हे केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून समाजसुधारणेचा, माणुसकीचा आणि राष्ट्रनिर्मितीचा दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री ना. गिरीश महाजन यांनी केले. जगद्गुरु द्वाराचार्य विद्यावाचस्पती डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांच्या अमृतमहोत्सव सोहळ्याप्रसंगी ना. गिरीश महाजन बोलत होते.

श्रीक्षेत्र लहवित येथे आयोजित लहवितकर महाराजांचा अमृतमहोत्सव सोहळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता समाजप्रबोधनाचा व्यापक मंच ठरला. संतपरंपरा, कीर्तन, प्रवचन आणि सामाजिक संदेश यांच्या माध्यमातून महाराजांच्या विचारांचा जागर करण्यात आला. हजारो भाविकांसह राज्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या सोहळ्यास उपस्थिती लावली. या अमृतमहोत्सव सोहळ्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शुभेच्छा संदेश प्राप्त झाले होते. या संदेशांमध्ये लहवितकर महाराजांच्या आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रसेवात्मक कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी पुढे बोलताना जलसंपदामंत्री ना. गिरीश महाजन म्हणाले, की डॉ. रामकृष्णदास महाराज लहवितकर यांनी अध्यात्माला केवळ पूजा-पाठापुरते मर्यादित न ठेवता त्याला सामाजिक जाणिवेची आणि राष्ट्रहिताची दिशा दिली. शिक्षण, आरोग्य, सामाजिक समता, व्यसनमुक्ती आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांवर आधारित त्यांचे कार्य सर्व समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा संतविभूतींचे विचार हे केवळ एका कालापुरते नसून पिढ्यानपिढ्या समाजाला योग्य मार्ग दाखविणारे ठरतात. राज्याचे अन्न व औषधद्रव्य प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ आ. डॉ. सुधीर तांबे आणि संगमनेरचे माजी आमदार डॉ. बाळासाहेब थोरात यांनीही आपल्या भाषणात लहवितकर महाराजांच्या कार्याचा गौरव केला.

या अमृतमहोत्सव सोहळ्यास खा. राजाभाऊ वाजे, खा. भास्करराव भगरे, आ. सरोज अहिरे, आ. ॲड. राहुल ढिकले, आ. डॉ. किरण लहामटे, आ. हिरामण खोसकर, माजी खा. हेमंत गोडसे, भाजपचे शहराध्यक्ष सुनील केदार, माजी आमदार सर्वश्री बाळासाहेब सानप, अनिल आहेर, शिवराम झोले, वैभव पिचड, भारतीय जनता पक्षाचे नेते विजय साने, लक्ष्मण सावजी, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, मनपा स्थायी समितीचे माजी सभापती गणेश गिते, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे, काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, त्र्यंबकराव गायकवाड, मुरलीधर पाटील, सुधाकर बडगुजर, भाजप नेते दिनकर पाटील, नारायण वाजे, उदय सांगळे, सचिन ठाकरे, निवृत्ती जाधव, ॲड. सोमनाथ घोटेकर, नारायण मुठाळ, दिगंबर गिते, संपतराव सकाळे आदींसह असंख्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामकृष्ण महाराज लहवितकर ट्रस्टचे अध्यक्ष गंगाधर जाधव यांनी केले. सूत्रसंचालन विवेक महाराज केदार यांनी केले, तर आभारप्रदर्शन शिवा महाराज आडके यांनी केले.

या अमृतमहोत्सव सोहळ्याच्या यशस्वितेसाठी ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली तुपे, राहुल महाराज गायकवाड, तुकाराम महाराज शिंदे, राहुल महाराज खालकर, सूर्यकांत महाराज सहाणे, दीपक महाराज पोरजे, हर्षद महाराज जाचक, संदीप महाराज लोहकरे, ऋषिकेश महाराज गायखे, कन्हैया महाराज लोणारी, तेजस महाराज खालकर, तुषार महाराज खालकर, वैभव महाराज गाढवे, शुभम महाराज कड, सागर महाराज सांगळे, भूषण जाधव, सूरज महाराज शिंदे, अवधूत महाराज आहेर आदींनी विशेष परिश्रम घेतले. ट्रस्टचे पदाधिकारी, सेवेकरी, स्वयंसेवक तसेच लहवित व पंचक्रोशीमधील ग्रामस्थ व भाविकांनी परिश्रम घेतले.

# लासलगाव एसटी बस स्थानकाचे काम संथगतीने

## साडेसहा कोटींचा आमदार निधीतून मंजूर असूनही प्रवाशांचे हाल



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर)** :- राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांच्या मतदारसंघातील महत्त्वाचे गाव असलेल्या लासलगाव येथील एस. टी. बस स्थानकाच्या नूतन इमारतीसह विविध विकास कामांसाठी भुजबळांनी आमदार निधीतून सुमारे साडेसहा कोटी रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला; मात्र प्रत्यक्षात या कामाची अंमलबजावणी ठेकेदाराकडून अत्यंत संथगतीने सुरू असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

लासलगाव हे कांदा बाजारपेठेसाठी राज्यातच नव्हे, तर देशभरात ओळखले जाणारे गाव असून, दररोज हजारो प्रवासी येथील एस. टी. बस स्थानकावरून प्रवास करतात. असे असताना बस स्थानकाच्या नूतनीकरणाचे काम रखडल्यामुळे प्रवाशांची गैरसोय वाढली आहे. गेल्या उन्हाळ्यात तब्बल ४४ अंश सेल्सिअस तपमानात प्रवाशांना उघड्यावर बसेसची वाट पाहावी लागली होती. सावलीत बसण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला, तसेच विद्यार्थी प्रवाशांचे मोठे हाल झाले. इतकेच नव्हे, तर पावसाळ्यातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.

निधी मंजूर झाल्यानंतर काम वेगाने पूर्ण होईल, अशी अपेक्षा प्रवाशांना होती; मात्र निधी उपलब्ध असूनही ठेकेदाराकडून कामात दिरंगाई होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करत प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कामाची प्रगती तपासावी आणि प्रवाशांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा शिवसेनेचे तालुकाप्रमुख प्रकाश पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

येत्या उन्हाळ्यात पुन्हा प्रवाशांचे हाल होऊ नयेत, यासाठी संबंधित ठेकेदाराने तातडीने कामाला गती द्यावी, अशी जोरदार मागणी विद्यार्थी, नियमित प्रवासी, स्थानिक नेते, तसेच नागरिकांकडून करण्यात येत आहे.

कामात सुधारणा न झाल्यास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच परिवहनमंत्री यांच्याकडे ठेकेदाराविरोधात तक्रार करण्याचा इशाराही विद्यार्थिनी साक्षी वाघचौरे हिने दिला आहे.

लासलगाव येथून दररोज चांदवड येथे उच्च शिक्षणासाठी जावे लागत आहे. अनेक वेळा एसटी अर्धा ते एक तास उशिरा येते. त्यामुळे भरउन्हात एसटीची वाट पाहावी लागते. तातडीने इमारतीचे काम पूर्ण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबरच ना. भुजबळ यांनी लक्ष घालावे, अशी मागणी होत आहे.

# नेऊरगाव-एरंडगाव परिसरात बिबट्याची पिंजऱ्यालाच हुलकावणी



**येवला (भ्रमर वार्ताहर)** :- नेऊरगावह्नएरंडगाव परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एरंडगाव - नेऊरगाव रस्त्यावर चिंधीआई परिसरात बिबट्या दबा धरून बसतो, अशी चर्चा सुरू असल्याने त्या मार्गावरील पाल्यांना पालक शाळेत पाठवेनासे झाले आहेत, तर काही पालक स्वतःच्या वाहनाने पाल्यांना शाळेत पोहोचवीत आहेत.

शेतशिवारात, तसेच वस्तीच्या आसपास बिबट्या दिसल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाकडून बिबट्या पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला असला, तरी बिबट्या पिंजऱ्यालाच हुलकावणी देत असल्याने नागरिकांची चिंता आणखी वाढली आहे.

बिबट्याच्या दहशतीचा सर्वाधिक परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होताना दिसत आहे. सकाळी व दुपारी शाळेत ये-जा करताना भीती वाटत असल्याने अनेक पालकांनी मुलांना शाळेत पाठविणे टाळले आहे. परिणामी शाळांमधील विद्यार्थीसंख्या लक्षणीयरीत्या रोडावली आहे. काही पालक स्वतः मुलांना शाळेत पोहोचविण्यासाठी दिवसातून दोन ते तीन वेळा चकरा मारत आहेत. कामधंदा सोडून पाल्यांच्या सुरक्षिततेसाठी धावपळ करावी लागत असल्याची भावना पालक व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, शेतकऱ्यांनाही रात्रीच्या वेळी शेतात जाणे धोकादायक ठरत आहे. पाळीव जनावरांवर हल्ल्याची भीती असून ग्रामस्थांनी रात्री बाहेर पडणे टाळले आहे. ग्रामस्थांनी वनविभागाकडे गस्त वाढवण्याची, अधिक पिंजरे लावण्याची तसेच तातडीने बिबट्या जेरबंद करण्याची मागणी केली आहे. तालुक्याच्या उत्तरपूर्व व पश्चिम पट्ट्यात वनविभागाचे मोठे क्षेत्र आहे. ममदापूर, राजापूर, देवदरी, खरवंडी, रहाडी, रेंडाळे, आदी परिसरात वनविभागाचे मोठे क्षेत्र आहे. त्यात हरणे, काळवीट, मोर, तरस, कोल्हे, लांडगे, आदी पशू-पक्ष्यांबरोबरच इतरही वन्य प्राणी आहेत. त्याचबरोबर बिबट्यांची संख्याही वाढत आहे.

> वनविभाग केवळ बिबट्यांवर नव्हे, तर सर्वच वन्य प्राण्यांवर उपचार करत आहे. विहिरीत पडलेल्या हरीण, काळवीट, कोल्हा, सायाळ, उदमांजर यांच्यासाठीही आधुनिक बचाव पथक तत्पर आहे. बिबट्या दिसल्यास त्वरित वनविभागाला माहिती द्यावी. रात्री बाहेर पडताना काळजी घ्यावी. पाळीव जनावरांना गोठ्यात बांधावे, वनविभागाकडून योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत.
>
> **- राहुल घुगे, वनाधिकारी, येवला**

# त्र्यंबकेश्वर महाविद्यालयात निर्भय कन्या कार्यशाळा संपन्न

**त्र्यंबकेश्वर (भ्रमर वार्ताहर)** :- मविप्र संचलित येथील महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, विद्यार्थी कल्याण मंडळ आणि महिला तक्रारनिवारण समितीअंतर्गत महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान ही एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान कुशारे होते. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात ॲड. समाधान मोरे यांनी मुलींना, महिलांचे हक्क व कायदे या विषयावर माहिती दिली, तसेच मुलींनी त्यांच्या मनात असणाऱ्या शंका विचारल्या.


दुसऱ्या सत्रात व्याख्याते डॉ. योगीता जाधव यांनी स्त्रियांचे मानसिक आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ध्यान, साधना, योग व सामाजिक माध्यमांचे होणारे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. तिसऱ्या सत्रात स्वामी विवेकानंद केंद्र, पिंपळद येथील दामिनी टोपले व निशा भोये यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षण कसे करावे, याविषयी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दाखवले. महिला तक्रारनिवारण मंडळाच्या डॉ. मनीषा पाटील यांनी कार्यक्रमाचे आयोजन, तसेच उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख डॉ. मनोहर जोपळे यांनी केले. प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय प्रा. ममता धनगर यांनी करून दिला. सूत्रसंचालन महिला तक्रारनिवारण समिती सदस्या प्रा. शाश्वती निरभवणे यांनी केले. कार्यक्रमाला रासेयो प्रा. विष्णू दिघे, प्रा. ऋषिकेश गोतरणे आदी उपस्थित होते.



# एआयनिर्मित प्रकल्पाची विद्यार्थ्यांना भुरळ

## मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान करा रे !




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर नवमतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी नाशिकमधील जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहाने कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने एक अनोखा प्रयोग केला आहे.

या समूहाने द पस्या एंटरटेन्मेंट, नाशिक यांच्या माध्यमातून 'मतदान करा रे!' या गाण्याची द्वितीय आवृत्ती 'मतदान करा रे! २.०' नुकतीच यूट्यूबवर प्रदर्शित केली आहे.

या गाण्याची पहिली आवृत्ती विधानसभा निवडणुकीच्या वेळी प्रसिद्ध करण्यात आली होती आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता; मात्र यावर्षी प्रदर्शित करण्यात आलेली 'मतदान करा रे! २.०' ही आवृत्ती अधिक आकर्षक, प्रभावी आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत स्वरूपाची असल्याने विद्यार्थ्यांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरत आहे. सुनो एआय या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करण्यात आलेले हे गाणे तरुण व नवमतदारांमध्ये मतदानाची जबाबदारी जागृत करण्यात यशस्वी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहाचे समूहप्रमुख व एआय अभ्यासक प्रसाद भालेकर यांनी सांगितले, की विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण प्रकल्पांचा अनुभव मिळावा या उद्देशाने निवडणूक जागृतीचा विषय घेऊन एआयच्या माध्यमातून हे गाणे साकारले आहे. या प्रकल्पातून एक महत्त्वाचा संदेश दिला जात आहे, की एआयच्या माध्यमातून केवळ इंग्रजी किंवा हिंदीच नव्हे, तर मराठी भाषेतूनही उच्च दर्जाची गीतनिर्मिती शक्य आहे.

मराठी भाषेत एआयच्या सहाय्याने गीतनिर्मिती करणारा हा जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहाचा पहिलाच उपक्रम नाही. यापूर्वीही समूहाने मार्गदर्शन शिबिराच्या प्रचारासाठी तसेच विविध सामाजिक विषयांवर मराठी भाषेतील एआय प्रयोग यशस्वीरीत्या राबविले आहेत. या विशेष गाण्यात छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या घोषणांचा सूर प्रभावीपणे उमटवण्यात आला असून, एआयच्या माध्यमातून शिवशंभूंना मानवंदना देण्यात आली आहे.

या अभिनव एआय आधारित प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचेही लक्ष वेधले गेले आहे. सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय विद्यार्थ्यांमध्ये विशेष आकर्षणाचा ठरत असल्याने, यासंदर्भात अधिक मार्गदर्शन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उद्देशाने दि. ४ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. भालेकर यांनी सांगितले, की या विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरामध्ये बोर्ड परीक्षा व करिअर मार्गदर्शनासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना एआय संदर्भातील विविध नावीन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती, तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांचा अनुभव देण्यात येणार आहे. करिअरच्या दृष्टीने एआय क्षेत्रातील संधी आणि शक्यता यांविषयी विस्तृत माहिती दिली जाईल. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार उन्हाळी सुट्टीत विशेष सत्रांचे आयोजन करण्याचाही विचार असल्याचे समूहप्रमुखांनी स्पष्ट केले.

# मनुष्याचे महत्त्व हे त्यांच्या विचारावरच अवलंबून : देगलूरकर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- मनुष्याचे महत्त्व हे त्यांच्या विचारावरच अवलंबून असते. ज्या नराजवळ विचार नसतो, त्याला कवडीची किंमत नसते, असे प्रतिपादन चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले.

येथील परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सुरू असलेल्या सद्गुरू सेवा समितीच्या भानुदास महाराज देगलूरकर स्मृती प्रचवनमालेचे अंतिम पुष्प चैतन्य महाराज देगलूरकर महाराज यांनी गुंफले. 'आता विश्वात्मकु तो माझा' या विषयावर बोलताना चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, की विश्वात्मक हा तत्त्वाधिष्ठित शब्द आहे. ते व्यापक आहे. हा शब्द सद्गुरूच्या रूपाची उकल करणारा आहे.

ज्ञानासाठी गुरूकडेच जावे लागते. ज्ञानेश्वर ग्रंथ साहित्याचा की विद्वानांचा ग्रंथ आहे. साहित्य, भावना आणि ज्ञानाचा स्रोत म्हणजे ज्ञानेश्वरी ग्रंथ आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी महान आहे. भाव आणि अक्षरज्ञान या दोन्ही एका केंद्रात आणणे कवीला शक्य होत नाही.

यावेळी त्यांनी सांगितले, की नाव व रूप एक ना एक दिवस नष्ट होते; मात्र जे संत समाजाला पुरून उरले ते कायम स्मरणात राहिले. त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते. त्यांच्या नावात स्वरूपाचा संबंध होता म्हणून ते कायम स्मरणात राहिले. जे प्राप्त झाल्यानंतर काहीच मिळविण्यासारखे राहत नाही, ते म्हणजे ज्ञान.

ज्ञान हे ब्रह्मस्वरूप आहे आणि तोच परमात्माही आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. श्रीपाद कुलकर्णी याना आभार मानले. यावेळी श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साने गुरुजी संस्कार परीक्षेत २१२ विद्यार्थ्यांचा सहभाग

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर)** :- नूतन विद्याप्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात साने गुरुजी जयंतीनिमित्ताने साने गुरुजी कथामालेअंतर्गत संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

साने गुरुजींच्या अमर कृती 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित या परीक्षेत एकूण २१२ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये साने गुरुजींच्या साहित्याबद्दल असलेली आवड या मोठ्या प्रतिसादातून स्पष्ट झाली. जयंतीदिनी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. कार्यक्रमाला उपप्राचार्य भूषण हिरे, समन्वयक डॉ. संजय निकम, तसेच स्नेहसंमेलनप्रमुख किशोर गोसावी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन राम कदम यांनी केले. आभारप्रदर्शन जयश्री पाटील यांनी केले. समन्वयक व प्रास्ताविक पर्यवेक्षक उज्ज्वल सुभाष शेलार यांनी केले. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या एकजुटीने व सहकार्यामुळे हा कार्यक्रम पार पडला. संस्थेचे जनरल सेक्रेटरी गोविंद होळकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# राज्य खो-खो स्पर्धेत नाशिकच्या महिला संघाला कांस्यपदक



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- सलग दुसऱ्या वर्षी नाशिकच्या महिला संघाने राज्य अजिंक्यपद आणि निवड चाचणी खो-खो स्पर्धेत महिला गटात आपला दबदबा कायम ठेवताना सलग दुसऱ्या वर्षी संयुक्त तिसरे स्थान मिळवीत कांस्यपदक पटकावले.

उपांत्य फेरीपर्यंत नाशिकच्या संघाने गटवार साखळी स्पर्धेत बीड आणि जालना या संघाचा, तर बाद फेरीत प्रथम सातारा संघाचा, तर उपउपांत्य फेरीत रत्नागिरी संघाचा पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी राज्यातील पहिल्या चार संघांमध्ये स्थान पटकाविले. उपांत्य फेरीत धाराशिव संघाने नाशिकचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागल्यामुळे नाशिकच्या संघाला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. नाशिकच्या संघातील सर्व खेळाडू हे संस्कृती नाशिक व स्व. सुरेखाताई भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीचे आहेत. नाशिकच्या विजयात कर्णधार विद्या मिरके, सरिता दिवा, दीदी ठाकरे, सुषमा चौधरी, ऋतुजा सहारे, मनीषा पडेर, ज्योती मेढे, नमीषा भोये, कौसल्या कहांडोळे, ताई पवार, रोहिणी भवर, जागृती जाधव, चंचल शिंदे, प्राजक्ता बोरसे व नीलम मोहंडकर यांनी मोलाचा वाटा उचलला. हे सर्व खेळाडू हुतात्मा स्मारक, सी. बी. एस. येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे वर्षभर सकाळ आणि सायंकाळी उमेश आटवणे आणि गीतांजली सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करीत असतात. या सर्व खेळाडूंचे नाशिक जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. प्रदीप पवार, आजीवन अध्यक्ष रमेश भोसले, संस्कृती नाशिकचे अध्यक्ष शाहू खैरे, आनंद गारमपल्ली व सुनील गायकवाड यांनी कौतुक केले.

# 'मी स्वत:' पुस्तकाचे प्रकाशन

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर)** :- लासलगाव येथील नूतन विद्याप्रसारक मंडळ, कॉलेजची इयत्ता बारावीत शिकणारी विद्यार्थिनी स्वाती प्रल्हाद आहेर हिने अल्पवयातच स्वतःचे पुस्तक प्रकाशित केल्याने तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. 'मी स्वत:' असे तिच्या पुस्तकाचे नाव आहे.

तिला सातवीपासूनच लेखनाची आवड होती व अकरावीत असताना तिने पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. सुमारे सात महिन्यांच्या मेहनतीनंतर ते पुस्तक पूर्ण झाले. तिच्या पुस्तकाचे संपादन धीरज जाधव, इंदूर यांनी केले आहे. शालेय शिक्षण घेत असतानाही स्वातीने साहित्य क्षेत्रात दाखविलेली प्रगती प्रेरणादायी असल्याचे मानले जात आहे.

# ना. आठवले यांचा वाढदिवस साजरा




**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)** :- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिकरोड येथे गरजू व निराधार नागरिकांना ब्लँकेट व फळे यांचे वाटप करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव संयोजक समितीप्रमुख सुनील कांबळे यांच्या पुढाकारातून रेल्वेस्थानक परिसरात गरिबांना चादरी, ब्लँकेट, तसेच फळांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी अतुल भावसार, अक्षय बर्वे, बाळा गांगुर्डे यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या सामाजिक कार्याचा व वंचित घटकांसाठी केलेल्या योगदानाचा गौरव केला.

ना. रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आल्याने त्याला विशेष महत्त्व आहे, असे मत सुनील कांबळे यांनी यावेळी व्यक्त केले.

# एमआयएमचे देवळाली विधानसभा अध्यक्ष तांबोळी यांचा राजीनामा



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)** :- ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाचे देवळाली विधानसभा अध्यक्ष, तसेच प्रभाग क्रमांक २१ मधील इच्छुक उमेदवार सत्तार लतीफ तांबोळी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा त्यांनी जिल्हाध्यक्ष रमजान पठाण यांच्याकडे पाठविला आहे.

राजीनाम्यामागील कारण स्पष्ट करताना तांबोळी यांनी पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी इच्छुक उमेदवारांना विश्वासात घेत नसल्याचा आरोप केला आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय पक्षांतून इच्छुक उमेदवार व दिग्गज पदाधिकारी पक्षांतर करीत असल्याचे चित्र दिसत आहे. एआयएमआयएम पक्षालाही अंतर्गत नाराजीचा सामना करावा लागत आहे.

तांबोळी यांनी सांगितले, की समविचारी पक्षांशी युती करावी, तसेच कोणतीही अट न घालता प्रभागनिहाय इच्छुक उमेदवारांना उमेदवारी द्यावी, अशी त्यांची भूमिका होती; मात्र पक्षातील ज्येष्ठ पदाधिकारी इच्छुक उमेदवारांना बळ देण्याऐवजी त्यांचे मनोबल खच्चीकरणाचे काम करीत असल्याने आपल्या पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या राजीनाम्यामुळे देवळाली विधानसभा मतदारसंघातील एआयएमआयएम पक्षाच्या संघटनात्मक रचनेवर परिणाम होण्याची शक्यता असून, तांबोळी यांची पुढील राजकीय भूमिका काय असेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आजचे वाढदिवस


**दिगंबर शहाणे** ज्येष्ठ पत्रकार


**रतिशबापू दशपुत्रे** सामाजिककार्यकर्ते


**उत्तरा खेर** सामाजिककार्यकर्त्या


**डॉ. सुचेता बच्छाव** माजी अध्यक्षा जिल्हा बँक


**संजय देशमुख** सेवानिवृत्त पो.नि.


**अनिता बोराडे** नाशिकरोड


**शशांक देशपांडे** संचालक, निशम डेव्हलपर्स


**संजय भटमुळे** चाळीसगाव


**शेखर कुलकर्णी** सामाजिक कार्यकर्ते

# त्र्यंबकेश्वर शिवसेनेच्या गटनेतेपदी प्रशांत गायधनी यांची एकमताने निवड



**त्र्यंबकेश्वर (भ्रमर वार्ताहर):–** त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रीया पार पडल्यानंतर आता सत्ता स्थापनेसाठी हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष शिवसेनेला याशिवाय राष्ट्रवादीला ७ जागा, शिवसेनेला ६, भाजपाला ५ तर २ जागा अपक्षाला मिळाल्या. सत्ता स्थापनेसाठी बहुमत कोणालाच नसल्याने कोणाकोणाची युती होणार याकडे त्र्यंबकवासियांचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेच्या गटनेतेपदी एक अभ्यासू व शांत व्यक्तीमत्व असलेले प्रशांत गायधनी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसे प्रशांत गायधनी भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते, संघापासून ते आजपावेतो भाजपला अच्छे दिन आणण्यात त्यांचे कठोर परिश्रम होते. मात्र या निवडणुकीत भाजपने निष्ठावानांना डावलल्यामुळे शेवटी त्यांना धनुष्यबाण हाती घ्यावा लागला.

गटनेतेपदी निवड झाल्यामुळे नवनिर्वाचित नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार–सोनवणे, रविंद्र सोनवणे, निवडणूक यशाचे किंगमेकर डॉ. सत्यप्रिय शुक्ल, आकुशेठ चांदवडकर, चेतन तथा बाबुराव उगले, शहराध्यक्ष सचिन दिक्षित, भूषण अडसरे, समीर पाटणकर, नवनिर्वाचित नगरसेवक कुणाल तथा सनी उगले, सागर आडके, प्रथमेश कदम आदींनी त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

# प्रभाग क्र. ११ च्या सर्वांगिण प्रगतीचा ध्यास : सचिन राऊत



**माझा प्रभाग–माझे कार्य**

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** मनपा प्रभाग क्र. ११ मध्ये नव्या पर्वाचा उगम करून प्रभागाची सर्वांगिण प्रगती करून विकासाचा ध्यास असल्याचा निर्धार शिवसेना शिंदे गटाकडून इच्छुक असलेले सचिन ताराबाई रामराव राऊत यांनी व्यक्त केला.

सचिन राऊत हे राष्ट्रीय मराठा महासंघाचे जिल्हाप्रमुख असून, महाराष्ट्र राज्य कामगार सेनेचे (सुरक्षा रक्षक विभाग) चे सक्रिय नेते आहेत. राऊत हे सर्वसामान्य कुटुंबातील असून, त्यांना नागरिकांच्या प्रश्नांची चांगली जाण आहे. गेल्या १५ वर्षांपासून सचिन राऊत हे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असून, सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांनी केलेल्या कामामुळे त्यांची उच्चतम प्रतिमा निर्माण झाली आहे. राऊत यांनी सातपूर औद्योगिक क्षेत्रात कामगारांच्या न्याय हक्कांसाठी अनेक जनआंदोलने उभारली, कामगारांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. तसेच बडतर्फ, हंगामी कामगारांना पुनर्नियुक्ती मिळवून दिली आहे. कोरोना काळात थकीत वेतनधारक कामगारांना त्यांच्यासह कुटुंबियांच्या उपजिविकेसाठी आवश्यक साधनसामूग्री व रेशन उपलब्ध करुन देत हजारो सुरक्षा रक्षकांच्या सुरक्षिततेसाठी मास्क, सॅनिटायझर, आयसोलेशन सेंटर उभारून त्यांना जीवनदान देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याचप्रमाणे स्थानिक बेरोजगार युवकांना आयुष्यमानकार्ड, श्रमकार्ड व इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत त्यांना समाविष्ट करुन घेतले. जनआरोग्य शिबिराच्या माध्यमातून आरोग्य तपासणीचे विविध उपक्रम राबवून त्यात प्रभागासह सातपूर परिसरातील नागरिकांना विविध आरोग्य सुविधा पुरविल्या. त्याचप्रमाणे प्रभागातील नागरिकांच्या विविध मूलभूत समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध आंदोलने करीत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याचे प्रभाग क्र. ११ ड मधील इच्छुक उमेदवार सचिन राऊत यांनी यावेळी सांगितले.


सुरक्षा रक्षकांचे ११ महिन्यांचे थकीत वेतन तत्काळ मिळावे यासाठी मनपा मुख्यालयाबाहेर निदर्शने करताना सचिन राऊत व सहकारी.

# अशोका बिल्डकॉनला प्रतिष्ठेचा 'सीआयए वर्ल्ड' पुरस्कार



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** गुणवत्ता, सर्जनशीलता आणि कार्यतत्परता या वैशिष्ट्यपूर्ण त्रिसूत्रीसाठी देशभर ज्ञात असलेल्या येथील अशोका बिल्डकॉन लिमिटेडला प्रतिष्ठेच्या 'सीआयए वर्ल्ड पुरस्कार' मालिकेत नुकतेच गौरवण्यात आले. रस्ते निर्माण प्रकल्प श्रेणीमध्ये सर्वोत्तम पायाभूत सुविधा पुरवठादार कंपनी म्हणून 'अशोका'च्या शिरपेचात हा मानाचा तुरा खोवण्यात आला.

ख्यातनाम एपिक मिडियातर्फे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. मुंबईस्थित नेहरू सेंटर यथे पार पडलेल्या शानदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अशोका बिल्डकॉन लिमिटेडच्या वतीने सहयोगी उपाध्यक्ष सुभेंदू बोस यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अशोका बिल्डकॉनने गेल्या अडीच दशकांत देश–विदेशांत गुणवत्तापूर्ण रस्ते प्रकल्प उभारून लौकिक प्राप्त केला आहे. यापैकी अनेक प्रकल्प निर्धारित वेळेच्या आत उभारून कंपनीने आगळ्यावेगळ्या विक्रमांची नोंद केली आहे. कंपनीच्या याच कामगिरीची नोंद घेत एपिक मिडियाने हा सन्मान केला. या पुरस्कार प्राप्तीबद्दल अशोका समूहाचे चेअरमन अशोक कटारिया, व्यवस्थापकीय संचालक सतीश पारख यांनी सुभेंदू बोस आणि टीमचे अभिनंदन केले.

# तळेगाव एमआयडीसीत उद्या रोजगार मेळावा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ४०३ अ तळेगाव एमआयडीसी वसाहत, ता. इगतपुरी येथे उद्या (दि. ३०) पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ४४१ पेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

उद्या सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ४०३ अ तळेगाव एमआयडीसी वसाहत, इगतपुरी येथे नोकरी इच्छुक उमेदवारांकरिता आयोजित मेळाव्यात बॉश लिमिटेड, नाशिक, ॲक्युआ टच वॉटर सोल्युशन्स, पीएमईए सोलर टेक सोल्यु. लि., लेसी कंट्रोल्स प्रा. लि., सिड्स इंडिया नॉलेज प्रा.लि., नाशिक, एन्ट्रो पॉवर सिस्टिम प्रा.लि., प्रदिप मेटल्स लि. मुंबई, बीएसए कॉर्पोरेशन लि., अभिनव इंडस्ट्रिज ऑफ टेक्नोलॉजी, इनोवा रबर्स प्रा.लि. अशा एकूण १० पेक्षा जास्त नामांकित कंपन्या व नियोक्ते ४४१ पेक्षा जास्त पदांकरिता येथे उपस्थित राहुन प्रत्यक्ष मुलाखती घेणार आहेत. या मेळाव्यात ८ वी पास, दहावी, बारावी, तसेच कोणत्याही पदवी, पदव्युत्तर पदवी, आयटीआय, डिप्लोमा,डिग्री इंजिनिअर यासह विविध शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी अद्याप पर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www. mahaswayam.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करावी. तसेच लॉगीन करुन शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी ॲप्लाय करावे. याबाबत काही अडचण आल्यास सहाय्यासाठी कार्यालयाच्या ईमेलवर **nashikrojgar@gmail.com** तसेच ०२५३ २९९३३२१ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा. या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## कमी दाबाने पाणीपुरवठा


**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नांदूर परिसरातील जॉकी नगरमध्येमागील काही दिवसांपासून अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे या परिसरातील महिला, नागरिक त्रस्त झाले आहेत. काही ठिकाणी एकवेळ पाणी येते ते देखील कमी दाबाने. त्यामुळे रोजच्या गरजा भागविण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नसल्याचे महिलांचे म्हणणे आहे.

# एस.बी.आय. एटीएममध्ये ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** पंचवटी परिसरातील एस.बी.आय. एटीएममध्ये ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजी लक्ष्मण पाटील (वय ६९, रा. औदुंबरनगर, अमृतधाम, पंचवटी, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी पाटील हे पेठनाका, एरंडवाडी येथील एस.बी.आय. बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी अंदाजे ४० वर्षे वयाचा एक अनोळखी इसम त्यांच्या मागे उभा राहून एटीएम पिनकोड पाहत होता. त्यानंतर फिर्यादी यांची नजर चुकवून या इसमाने हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदल केली. यानंतर २६ डिसेंबरपर्यंत विविध एटीएममधून एकूण ८० हजार रुपये काढण्यात आले. २७ डिसेंबरला हा प्रकार लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी पंचवटी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेची माहिती मिळताच वपोनि गजेंद्र पाटील, सपोनि शिरसाठ आणि पोहवा आहिरे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

# आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे जागतिक ध्यान दिन साजरा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** आंतरिक शांती आणि जागतिक



सुसंवाद हि संकल्पना उराशी बाळगून २१ डिसेंबर २०२५ हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणुन आर्ट ऑफ लिव्हिंग नाशिक परिवारातर्फे उत्साहात साजरा २१ डिसेंबर२०२५ रोजी तसेच संपुर्ण आठवडाभर नाशिक जिल्हा आणि शहरात नाशिक आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे अनेक ठिकाणी ध्यान सत्रं घेऊन दुसरा जागतिक ध्यान दिवस उत्साहात साजरा झाला.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक जागतिक किर्तीचे आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी ध्यानाबद्दल जगाला मार्गदर्शन केले. त्यांच्या कृपाशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने नाशिकमधील अनेक मान्यवरांनी हे ध्यान अनेकांपर्यंत पोहोचावे, यासाठी पाऊल उचलले. त्यात संस्थेचे पेक्स मेंबर डॉ. उमेश मराठे यांनी मोलाचे सहकार्य दिले. त्यांच्या अनेक सहकाऱ्यांमध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश सूर्यवंशी यांनीही ध्यानाचे महत्त्व पटवून दिले.

कायदेतज्ज्ञ आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक बिपीन शिंगाडा यांनीसुद्धा या दिवसानिमित्त कायदा क्षेत्रातील अनेक मान्यवरांचे ध्यान घडवून आणले तर शिक्षण क्षेत्रात माधुरी पवार यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयात ध्यानाची अनुभुती घडवली. नाशिक शहर आणि जिल्ह्यातील अनेक शाळा तसेच विविध सोसायट्यांमधुन नाशिक आर्ट ऑफ लिव्हिंगच्या अनेक प्रशिक्षकांनी आणि स्वयंसेवकांनी ध्यानाची अनुभुती लोकांपर्यंत पोहोचवत जागतिक ध्यान दिवस साजरा केला.

# पर्यावरणाला साथ देणाऱ्यांच्याच पाठीशी उभे रहा : आदित्य ठाकरे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** प्रभू रामचंद्रांचा सहवास पवित्र असलेले धार्मिक तपोवन हे तपोवनच रहावे. येथील वृक्षांची तोड होऊ नये, याकरिता जनआंदोलन करणाऱ्यांच्या पाठीशी आपण असून विकासाच्या नावावर येथील धार्मिक, प्राचीनपण घालविण्याचा प्रयत्न झालास त्याला कडाडून विरोध केला जाईल, असा ठाम निर्धार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवा नेते, माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला.

आदित्य ठाकरे नाशिक शहरात आले होते. पक्षातील काही ज्येष्ठांनी अन्य पक्षात प्रवेश केल्यामुळे डॅमेज कंट्रोल करण्यासाठी तसेच नाशिक महापालिका पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने आदित्य ठाकरे हे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांसमवेत पंचवटीतील तपोवन भागात पाहणीसाठी आले होते. राज्य शासन सिंहस्थाच्या निमित्ताने शहर विकासाचा मुद्दा घेत अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करीत आहे. या वृक्षतोडीला जनता व विविध पर्यावरण संस्था संघटना कार्यकर्ते विरोध करत असताना या आंदोलनकर्त्यांना पाठबळ मिळावे, म्हणून शिवसेनेच्या वतीने पुढाकार घेत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना देखील या तपोवनातील वृक्षतोडी संदर्भात पाहणी दौऱ्याकरीता बोलविण्यात आले होते. भारतीय संस्कृतीमध्ये परंपरा जपताना मूर्ती पूजेपूर्वी वृक्षआदींची पूजा केली जात होती. या पंचमहाभूतांच्या पूजनाने आपले पूर्वज धार्मिक परंपरा जपत होते. तपोवनातील घनदाट जंगलात त्यावेळी प्रभू श्रीरामचंद्रांनी वनवास भोगला होता. प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने या भूमीला पावन केले आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देश व विदेशातील असंख्य भाविक या तपोभूमीला भेट देत असतात. तपोवनातील वृक्ष हे परंपरेनुसार वाढत आले असून त्यांची जपणूक करणे क्रमप्राप्त असताना राज्यातील सरकार विकासाच्या नावाने येथील वृक्षांची सर्रास तोड करीत आहे. हा प्रकार कोणीही सहन करू नका. त्याला तीव्र विरोध करा, असे सांगून आदित्य ठाकरे म्हणाले की, तपोवनातील वृक्षतोडीला विरोध करीत जनतेच्या पाठीशी राहणाऱ्या उमेदवारालाच निवडून द्या. हे करताना केवळ शाब्दिक होकार न घेता तसे लेखी लिहून घ्या. या प्रश्नावरून जनतेला विश्वासात घेणाऱ्यांच्याच पाठीशी उभे रहा, त्याकरिता उमेदवारांकडून ॲफिडेव्हीट लिहून घ्या, असा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी खा. राजाभाऊ वाजे, माजी आमदार वसंत गिते, शिवसेनेचे नेते दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, काँग्रेसचे प्रवक्ते माजी नगरसेवक राजेंद्र बागूल, गोरख वाघ, सुभाष शेजवळ, प्रसाद बागूल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राजू देसले, शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रथमेश गिते, भगवान भोगे आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थर्डी फर्स्ट निमित्ताने नाशकात पोलिसांचा कडक बंदोबस्त

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नववर्षाच्या स्वागतासाठी नाशिककर सज्ज झालेले असताना, यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडूनये, यासाठी नाशिक शहर व ग्रामीण पोलीस यंत्रणाही सज्ज झाली आहे. विनापरवाना मद्यपान न करता, तसेच कायद्याचे पालन करून नववर्षाचे स्वागत करण्याचे आवाहन नाशिक ग्रामीणचे अधीक्षक बाळासाहेब पाटील, नाशिक शहर गुन्हे शाखेचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांनी केले आहे. नाशिक शहर व जिल्ह्यात कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, ठिकठिकाणी नाकाबंदी करून अवैध मद्य वाहतूक व अमली पदार्थांविरोधी कारवाई केली जात आहे..नववर्षाच्या स्वागतासाठी नाशिककर सज्ज झालेले आहेत. शासनाने नववर्षाच्या स्वागतासाठी पहाटे पाचपर्यंत हॉटेल्सला पार्ट्यांची तर मध्यरात्रीपर्यंत मद्यविक्रीला परवानगी दिली आहे. त्यामुळे ३१ डिसेंबरची संपूर्ण रात्र नागरिकांना नववर्षाचा उत्सव साजरा करता येणार आहे. यातून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून रविवारपासून शहर–जिल्ह्यात पोलिसांचा कडेकोट पोलीस तैनात केला आहे. दि. १ जानेवारी २०२६ पर्यंत टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे. शहर–जिल्ह्यात ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात येऊन वाहनचालकांसह वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. जिल्ह्यात मंगळवारी (दि.३०) व बुधवारी (दि. ३१) पोलिसांची करडी नजर राहणार असून, नाकाबंदी केली जाणार आहे. फार्म हाऊससह विविध हॉटेल्समध्ये सेलिब्रेशनची तयारी करण्यात आलेली आहे. अनेक हॉटेल्स, रिसॉर्टची बुकिंग झाले आहेत. या ठिकाणी गैरप्रकार घडू नये, यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस सतर्क आहेत. जिल्ह्यातील ४० पोलीस ठाणेनिहाय नाकाबंदीचे नियोजन करण्यात आले आहे.जिल्ह्यात पोलिसांची पथके नेमण्यात आल्याची माहिती पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी दिली.

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कडेकोट नियोजन केले आहे. तीन उपायुक्त, सात सहायक आयुक्तांसह १२० पोलिस अधिकारी, दीड हजार पोलिस कर्मचारी, २५० होमगार्डस् यासह राज्य राखीव दलाच्या तुकड्या व दंगलविरोधी पथके तैनात राहणार आहेत. याशिवाय, महिलांची १० पथकांमार्फत गस्त राहील.

# १२८ दिग्गजांनी भरले उमेदवारी अर्ज

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** मनपा पंचवार्षिक निवडणुकीसाठी गेल्या चार दिवसांपासून अर्ज विक्री होत असतानाच काही नव्या व इच्छुक उमेदवारांसह आतापर्यंत एकूण १२८ दिग्गजांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. त्यामध्ये भाजपाचे सुधाकर बडगुजर, देवानंद बिरारी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या डॉ. हेमलता पाटील त्याचबरोबर माजी नगरसेवक वंदना मनचंदा, संजय नवले, मनोहर बोराडे, मंदाकिनी जाधव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

आतापर्यंत १२८ इच्छूकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३० डिसेंबर दुपारी ३ वाजेपर्यंत आहे दरम्यान, अद्याप कोणालाच राजकीय पक्षांचे अधिकृत ए.बी. फॉर्म मिळालेले नाहीत. सर्वाधिक इच्छुकांची संख्या असलेल्या भाजपने उमेदवारी नाकारलेल्यांना आपल्याकडे ओढण्यासाठी मविआला प्रतिक्षा असून बंडखोरी टाळण्यासाठी भाजपने मात्र शेवटच्या दोन तासांपुर्वी ए. बी. फॉर्म देण्याची व्यूहरचना केली असल्याचे सांगितले जात आहे.

| तारीख | अर्ज विक्री |
|---|---|
| दि. २३ | १७६३ |
| दि. २४ | १९४२ |
| दि. २६ | ११४८ |
| दि. २७ | ५५३ |
| एकूण | ५४०६ |

**बडगुजर कुटुंबियांकडून तीन अर्ज–** भाजपा नेते सुधाकर बडगुजर यांच्या कुटूंबियांकडून प्रभाग क्रमांक २५ मधून स्वत: सुधाकर बडगुजर, पत्नी हर्षा बडगुजर व मुलगा दीपक बडगुजर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

# नाशिक महानगरपालिकेत निवडणूक आदर्श आचारसंहितेबाबत आढावा बैठक संपन्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी संपन्न होत असून, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आदर्श आचारसंहिता प्रभावी व यशस्वीरीत्या अंमलात आणण्याच्या दृष्टीने नाशिक महानगरपालिकेत नियोजन व आढावा बैठक नुकतीच पार पडली.

ही बैठक आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस निवडणूक तथा प्रशासन उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी शरद घोरपडे यांच्यासह नाशिक महानगरपालिकेतील सर्व विभागीय अधिकारी तसेच आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी नियुक्त करण्यात आलेले सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, तक्रार निवारणाची कार्यपद्धती, प्रचार साहित्यावरील नियंत्रण, परवानग्या, तसेच क्षेत्रीय स्तरावर सतत व प्रभावी देखरेख ठेवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व निष्पक्षपणे पार पडावी, यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नाशिक महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असून, निवडणूक कालावधीत नियमभंगास कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा संदेश यावेळी देण्यात आला. आदर्श आचारसंहिता प्रभावीपणे राबवून मुक्त, निष्पक्ष व शांततामय वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी नाशिक महानगरपालिका सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# व्याजाचे पैसे वसुलीसाठी हॉटेल व्यावसायिकास ५ जणांकडून मारहाण

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** परिसरात अवैध सावकारी, जबरदस्तीने डांबून ठेवणे, मारहाण व खंडणी वसुली केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हॉटेलचालक साहेबराव दगा पानपाटील (वय ५३, रा. रामनगर, कळवण, जि. नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सन २०१६ मध्ये हॉटेल व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांनी चंद्रशेखर उर्फ पिंटू शिंदे (रा. नाशिकरोड) याच्याकडून एक लाख रुपये कर्ज घेतले होते. दरमहा दहा टक्के व्याजाने घेतलेली मूळ रक्कम एप्रिल २०१७ मध्ये पूर्ण फेड करण्यात आली होती. मात्र उर्वरित व्याज पुढील दोन महिन्यांत देण्याचे सांगूनही आरोपीने फिर्यादीकडून घेतलेल्या कोऱ्या धनादेशांपैकी एक धनादेश बँकेत टाकून तो बाउन्स करून फिर्यादीविरोधात नाशिकरोड न्यायालयात खटला दाखल केला.

तक्रारीनुसार, व्याजाची रक्कम वसूल करण्यासाठी १३ जून २०२५ रोजी आरोपी चंद्रशेखर शिंदे याचे साथीदार बबलू उर्फ अभिजीत पाटील, राम गोतिसे आणि संदिप सानप यांनी फिर्यादीस नाशिकरोड न्यायालयातून जबरदस्तीने मुक्तीधाम येथील कार्यालयात नेले. तेथे सर्व आरोपींनी मिळून फिर्यादीस डांबून ठेवत शिवीगाळ व मारहाण केली. तसेच पैसे नसतानाही मित्राकडून ऑनलाईन रक्कम उचलण्यास भाग पाडले.

यानंतर राम गोतिसे याने फिर्यादीस दुचाकीवरून दत्तमंदिर सिग्नल येथील ॲक्सिस बँकेच्या एटीएमवर नेऊन जीवे मारण्याची धमकी देत ५० हजार रुपये काढण्यास भाग पाडले. ही रक्कम चंद्रशेखर शिंदे याने कार्यालयात रोख स्वरूपात स्वीकारून उर्वरित २ लाख रुपये १५ दिवसांत देण्याची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यावेळी सर्व आरोपींनी फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली. तसेच आमच्या विरोधात न्यायालयात पुन्हा हजर राहिल्यास जिवंत कळवणला जाऊ देणार नाही, अशी धमकी देण्यात आल्याचेही फिर्यादीने म्हटले आहे. या धमक्यांमुळे फिर्यादी व त्यांचे कुटुंब दहशतीखाली जीवन जगत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात चंद्रशेखर उर्फ पिंटू शिंदे, बबलू उर्फ अभिजीत पाटील, राम गोतिसे, संदिप सानप व अनिल दुसाने यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि सपकाळे व पोउनि पवार करीत आहेत.

# नाशिक मनपा निवडणुकीसाठी काँग्रेस सेवादलाची २० जागांची मागणी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिका



निवडणुकीत शहर काँग्रेस सेवादलाला २० जागांवर उमेदवारी द्यावी, अशी मागणी काँग्रेस सेवादलाचे शहराध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांनी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे केली. गेल्या अनेक वर्षांपासून नाशिक महानगरपालिका व नाशिक स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या कारभारामुळे संपूर्ण नाशिक शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, समस्त नाशिककर नागरिक मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित राहिले आहेत. या जनतेच्या प्रश्नांवर नाशिक शहर काँग्रेस सेवा दलाने वेळोवेळी महानगरपालिका व स्मार्ट सिटी प्रशासनाच्या विरोधात आंदोलने करून त्यांना जाब विचारण्याचे काम केले आहे. या कार्याची दखल घेऊन काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी सेवादलाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना किमान २० जागांवर उमेदवारी द्यावी, अशी विनंती केली आहे. काँग्रेस सेवा दलाच्या अनुभवी व संघर्षशील पदाधिकाऱ्यांना संधी दिल्यास, काँग्रेस पक्षाचे विचार, याआधी काँग्रेसने महानगरपालिकेमध्ये केलेली विकासकामे तसेच भ्रष्टाचारमुक्त नाशिक महानगरपालिका या संकल्पनेला प्रभावीपणे पुढे नेण्याचे कार्य ते निष्ठेने करतील, असा विश्वास ठाकूर यांनी व्यक्त केला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_ bhramar@rediffmail. com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह ✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. ✻ Editor : Chandulal Shah ✻ Executive Editor : Hitesh Chandulal Shah.